THE

PRAYERS

OF THE

DAY OF ATONEMENT.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

Joseph Ezekiel Rajpurker

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

VOL. II.

BOMBAY:

PRINTED AT THE "ORIENTAL PRESS."

1868–5628.

THIS

WORK

HAS BEEN PUBLISHED

FOR THE

BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

AT THE EXPENSE OF

ABRAHAM SUKHOBA PENKER, ESQUIRE,

INSPECTOR IN THE MUNICIPAL DEPARTMENT,

IN MEMORY OF

HIS FATHER

SUKHOBA ETTJEE PENKER, ESQUIRE,

AND HIS UNCLE

BENJAMIN ETTJEE PENKER ESQUIRE.

תפלה ליום כפור

חלק ב.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग दुसरा.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें.

मुंबईमध्यें

" ओरिएन्टल " छापखान्यांत छापिलें.

इ. स. १८६८. इस्राएली ५६२८.

हा

ग्रंथ

लोकोपयोगाकरितां

अब्जम आब्राहाम सखोबा पेणकर

म्युनिसिपल खात्यांतील इन्स्पेक्टर, यांणीं आपले खर्चानें

स्वर्गवासी झालेले त्यांचे तीर्थरूप

अज्जम सखोबा येटजी पेणकर

आणि त्यांचे चुलते

अज्जम बिनयामीन येटजी पेणकर

यांचे स्मरणार्थ

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकरितां

छापून प्रसिद्ध केला.

प्रस्तावना.

या ग्रंथाच्या पूर्व भागीं प्रायश्चित्ताच्या दिवशीं पवित्र मंदिरांत जें पूजन होत असे, त्याचें निरूपण केलें आहे. त्या पूजनामध्यें अवघा दिवस जात असे, आणि त्याकडून पापाचें प्रायश्चित्त होऊन क्षमा होईल, या आशेनें सर्व लोक अंगणांत उत्सुकपणें उभे असत. तें पूजनमंदिर नसल्या कारणानें सध्यां मना झालें आहे, तरी या दिवसाचा नियम सर्वकाळपर्यंत चालणार, म्हणून त्या पूजनाबद्दल आपण आपल्या ओठांचीं वांसरें म्हणजे प्रार्थना वाहातों, आणि पूर्वीं तो अवघा दिवस जसा पूजनांत जात असे, तसा आतां प्रार्थनेंत जावा, आणि त्या शुद्धतेच्या दिवशीं अन्य विचारांचा संचार मनीं होऊं नये, म्हणून पांचवेळ प्रार्थना करावी, असा नियम आहे. पापाची क्षमा झाली असतां केवळ जीवनच प्राप्त होतें, तें साध्य करायास पूर्ण पश्चात्ताप करून एकाग्र चित्तानें ईश्वरापुढें विनंती केली असतां तो मान्य करितो.

या सर्व गोष्टीवरून या दिवसाचें माहात्म्य फारच मोठें आहे, असें दिसून येतें. नित्य तीन वेळ, शाब्बाथ दिवशीं व सणाच्या दिवशीं चार वेळ, परंतु प्रायश्चित्ताच्या दिवशीं पांच वेळ प्रार्थना करावी; आणि दुसरे सर्व उपास शाब्बाथ दिवशीं आले असतां दुसऱ्या दिवशीं करावे, परंतु हा उपास शाब्बाथ दिवशीं आला असतांहि करावा, यावरून व वर्षांतील सर्व दिवसांपेक्षां मोठा दिवस असें म्हटल्यावरूनहि त्याचें मोठें माहात्म्य कळून येतें.

हा ग्रंथ इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकरितां तयार झाला. परंतु तो लोकोपयोगाकरितां छापून प्रसिद्ध करण्याचा खर्च अज्जम आब्राहाम सखोबा पेणकर इन्स्पेक्टर यांनीं पुरविला, आणि ज्यांजवळ पहिला भाग असेल त्यांस हा दुसरा बक्षीस करावा असें त्यांनीं दर्शविल्यावरून मंडळीनेंहि त्याप्रमाणें ठराव

केला आहे. यावरून त्यांचें लक्ष लोककल्याणाकडे केवढें आहे; हें प्रत्यक्ष दिसून येतें. परंतु अशासाठीं आह्मास त्यांची प्रशंसा करायास नको, जें स्तुत्य काम त्यांनीं केलें आहे त्याकडूनच होईल. आमचे वाचक या ग्रंथाचा यथायोग्य उपयोग करून प्रसिद्ध करणाराचा हेतु पूर्ण करितील असी आशा आहे.

या ग्रंथांतील संक्षिप्त शब्द.

א׳ו׳א׳	==	אלהינו ואלהי אבותינו
ב׳א׳	==	ברוך אתה ״
व. प्र. प्रा.	==	वर्षप्रतिपदेची प्रार्थना
पा. क्ष. प्रा.	==	पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना
भा. प.	==	भाग पहिला.
शा. अ.	==	शाब्बाथ असल्यास
दो. वे.	==	दोन वेळा
ती. वे.	==	तीन वेळा
अ. ओ.	==	अध्याय. ओवी.
इ.	==	इब्री.

תפלה ליום כפור

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

מוסף

मुसाफ (अधिक प्रार्थना.)

" השיבנו हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव, ह्मणजे आम्ही फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

मुसाफा अगोदर हें बोलतात.

אשפוך דמי נפשי हे अनंता! तुझ्या दयासनापुढें मी आपल्या जिवाचें रक्त ओतितों, आपल्या प्राणाचा व आत्म्याचा सुगंध दाखवितों आणि काकुळती करून आपल्या अश्रूंचें पेय अर्पण करितों; तर हे करूबांत बसणाऱ्या, प्रगट हो, आणि हे माझ्या प्रभू राजा, तारण कर; कारण पूजनाचें तेल व सुगंध हीं नाहींसीं झालीं आहेत. तूं आपल्या नामाकरितां व गौरवाकरितां आपला मुगुट (राज्य) पुन: स्थापन कर. हे इस्राएलाच्या आशापात्रा! आमच्या राजा, आह्मास अगदींच कां विसरलास? आश्चर्यकारक शेवट * कोठपर्यंत तूं आह्मापासून गुप्त राखिशील? हे आमच्या बापा, त्वां आमचा सर्वकाळ धि:कार केला आहे काय? हे अनंत देवा! त्वरा करून दया कर, कारण आह्मामध्यें तुझें नाम गाजविलें आहे; हे जीवंत व निश्चल देवा, आह्मी तुजपुढें अनाथासारिखे आलों आहों; आह्मी विनंती करितों कीं, आह्मास सोडूं नको. आह्मी जाणतों कीं, तूं सर्व गोष्टी करूं शकतोस; कोणतीहि गोष्ट तुला असाध्य आहे काय? हे परमेश्वरा,

---

* माशीयाहचा वेळ.

तुझी दया व तुझें एकत्व आह्मास दाखीव; मग तुझा समुदाय तुजकडे परतेल, आणि लोक एकत्र होऊन तुझी सेवा करितील; तुझी दया आणि पाहिल्याप्रमाणें आतांहि तुझें सामर्थ्य थोर केव्हां होतील ? आकाशांतून तूं पाहा, कीं आह्मी नीच झालों; आणि तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; आह्मावरोबर जी अशुद्धता वास करिते, तिजपासून आह्मास शुद्ध कोण करील? हे देवा,* मी विनंती करितों कीं, आमच्या सर्व अपराधांचें प्रायश्चित्त कर व ते क्षमा कर; कारण आह्मी पाप केलें, अपराध केले, व उल्लंघनें केलीं; तूं आमचा धिक्कार नाहींसा कर, कारण तुझें नाम आह्मास दिल्हें आहे, तुझे दास व प्रियकर पृथ्वीवर जे सात्विक होते, जे रम्य ठिकाणीं तुझ्या विलक्षण नामाच्या पवित्रते-करितां एक वेळ व सात वेळ रक्त शिंपडीत असत, त्यांची आठवण कर; आणि त्यांस तूं आपल्या रागांत धूपाप्रमाणें ठेव (आणि त्यांची पुण्याई तूं आपल्या रागांत धूपाप्रमाणें मान्य कर;) जरी तुझा जीव (तूं) क्रोधामुळें सियोनेचा कंटाळा करितो, तरी तूं कां संतप्त होतोस ? हे देवा, तूं फीर आणि तेथें तूं आपलें परम पवित्र मंदिर आणि आपलें गौरव पुनः स्थाप. आणि मी विनंती करितों कीं, तुझ्या आसनांतून कोरलेल्या, तुझ्या दयारूप पाण्यांत अंघूळ करणाऱ्या, तुझ्या भयामुळें कांपणाऱ्या, आणि तुझ्या नामांत फुगणाऱ्या (गौरव मानणाऱ्या) आत्म्यास तूं मोल्यवान कर; जर तो आपल्या तर्फेकडून अशुद्ध असला, तर तूं आपल्या तर्फेकडून त्यास पवित्र कर, आणि यासाठींच इस्राएलांचा समुदाय तुजपुढें नेमाप्रमाणें येतो. हे बापा, लेंकरांस आज तूं आपली सत्यता कळीव; हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

קדיש לעילא भा. प. पृष्ठ ९.

एथें हळू व एकचित्ताने वाचायाचा אדני שפתי भा. प.

---

* एथें देव याचा इब्री शब्द השם आहे. ईश्वराचें नाम वेळोवेळ घेऊं नये ह्मणून त्या पवित्र नामाबद्दल या शब्दाचा उपयोग केला आहे.

पृष्ठ १४ पासून ותתן לנו पृष्ठ १७ याच्या शेवटपर्यंत वाचावें. त्यानंतर हें पुढील वाचावें.

- אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या पापांमुळें आह्मी आपल्या देशांतून पाडाव करून नेले गेलों, आणि आमच्या मुलुकापासून दूर केले गेलों आहों; यास्तव तुजपुढें अर्पण करायास आम्ही शकत नाहीं. आणि आह्मा-करितां प्रायश्चित्त करायास मुख्य याजकहि नाहीं, आमच्या ओठांची विनंती मात्र आहे. हे परमेश्वरा ! आमच्या व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा, तुजपुढें असी प्रसन्नता होवो कीं, तूं फिरून आह्मावर, आणि आपल्या अत्यंत दयेने आपल्या पवित्र मंदिरावर दया कर; आणि तें लवकर बांधून त्याचें वैभव वाढीव. हे आमच्या बापा, राजा व देवा, आह्मावर तूं आपल्या राज्याचें गौरव लवकर प्रगट कर; सर्व प्राण्यांच्या देखतां आह्मावर प्रकाशित होऊन थोर मानिला जा; आमच्या विखरलेल्यांस राष्ट्रांमधून जवळ आण; आ-णि आमच्या परागंदा झालेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून एकवट कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझें नगर सि-योन एथें आम्हास गायन करीत, आणि तुझें पवित्र नगर येरूशा-लेम एथें सर्वकाळच्या आनंदानें ने. हे परमेश्वरा, मग तेथें नित्या-चीं नेमलेलीं अर्पणें त्यांच्या रीतीप्रमाणें आणि अधिक अर्पणें त्यांच्या पद्धतीप्रमाणें आह्मी करूं ह्मणजे (शा. अ. या शाब्बाथ दिवसाचें व) या प्रायश्चित्ताचे दिवसाचे अपराधांची क्षमा होण्याच्या दिवसाचें, पवित्र मेळा मिळण्याच्या दिवसाचें अधिक अर्पण (शा. अ. अधिक अर्प-णें,) असीं आम्ही तुजपुढें प्रीतीनें, तुझ्या इच्छेच्या आज्ञांप्रमाणें, जसें तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून आम्हाकरितां तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे, त्याप्रमाणें आम्ही करूं व अर्पूं.

यानंतर עלינו לשבח भा. प. पृष्ठ ६१ हें वाचून त्यापुढें אלהינו ואלהי אבותינו पृष्ठ १७ पासून עושה שלום पृष्ठ २४ याच्या शेवटपर्यंत वाचावें.

אדני שפתי पुनः मोठ्याने बोलल्या अगोदर हीं पुढील दोन गीतें बोलण्याची चाल आहे.

ינוב פי ניב कठोर मन आपल्या तोंडचीं वचनें उच्चारील आणि त्याजकडे (देवाकडे) पुष्कळ भयानें जाईल. मी कोण? कीं, मी मुख्यास वाचा देणारा पुढें विनंती करावी! अग्नींतून कोरलेलीं मनुष्यें (दूत) स्तवन कधीं बंद करीत नाहींत; परंतु धिःकारलेला व वर्जलेला मनुष्य देवापुढें कसें भाषण करूं शकेल? त्याचें सैन्य लक्षावधि आहे, यद्यापि तें त्याच्या चमत्कारांचें पूर्ण वर्णन करूं शकत नाहीं; त्याच्या (सर्व) प्राणीमात्रांपेक्षां जो अति नीच, तो सदासर्वकाळ जीवंत (जो देव) त्याची स्तुति कशी करील? माझ्या पवित्रापुढें (देवापुढें) मी कसा फिरूं? आपलें डोकें कसें उंचावूं व कसें उत्तर देऊं? माझ्या जीवाकरितां मला फार उकळ येतो; कारण, तो उंचांमध्यें स्थापिलेला आहे, यास्तव जोंपर्यंत मी त्याजबरोबर वास करीत आहें, तोंपर्यंत उंचांत वस्ती करणारा जीवंत देव, जो दुर्बळांनी त्याची स्तुति सर्व दिवस करावी ह्मणून त्यास शक्ति देतो, त्याचें मी स्तवन करीन.

שמעתי " हे परमेश्वरा! तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

אלהי ישועתי " हे परमेश्वरा, माझ्या तारणाच्या देवा आणि माझ्या सहायाच्या आशापात्रा, आतां माझ्या तोंडच्या स्वसंतोषाचे अर्पणास तूं प्रसन्न हो, माझ्या आरोळीकडे मन लाव (तो आपल्या मंदिरांतून माझी वाणी व माझी काकुळती ऐकेल;) हे परमेश्वरा, मी तुला प्रार्थितों. "

חננו לך " हे परमेश्वरा, आह्मावर दया कर; आह्मी तुझी वाट पाहतों; आह्मी पाप केलें व विपरीत वर्तलों, आह्मी सर्व मेंढरांप्रमाणें बहकलों आहों; तरी तुजपुढें दया व सत्यता असोत, कारण तूं आमचा बाप आहेस; परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे. "

ידין עמים " जरी मनुष्य आपणास गुप्तांत लपवील, तरी परमेश्वर लोकांचा न्याय करील; तो नीतीनें भूमीचा आणि सरळ-

पणें राष्ट्रांचा न्यायाधिशी करील, तो दीनांस चालवील, कारण प्रायश्चित्ताच्या दिवसाचें स्मरण राखून ते देवाकडे फिरतात. ”

מחשבות יודע ” परमेश्वर मनुष्याचे विचार व सर्व कल्पना जाणतो, दुष्ट आपला मार्ग आणि पापी आपले विचार सोडील, आणि तो (ईश्वराकडे) फिरून पश्चात्ताप करील, मग त्याचीं सर्व पापें क्षमा करून हें त्याजकडे पुण्य असें मोज, तो परमेश्वराला दान आणील” ”

חלקי מנת ” परमेश्वर माझा विभाग, माझें गुप्तस्थान व माझी ढाल आहे, माझीं उल्लंघनें खोडून माझा अन्याय जावा म्हणून मला पर्के धू; माझ्या कण्हण्याच्या वर्णीने हाक मारून माझा गळा बसला आहे; हे परमेश्वरा ! खोलस्थानांतून मी तुला हाक मारीत आहें. ”

לדך משגב ” परमेश्वर दुःखितांचा आश्रय व इस्राएलांचा उद्धारणारा आहे; सर्व इस्राएलांमध्यें माझा न्याय तुझ्या पुढून प्रगट होईल; हे इस्राएलाच्या आशापात्रा ! गुप्त दोषांविषयीं तूं मला निर्दोषी कर, माझ्या पापापासून मला शुद्ध कर; कारण हे परमेश्वरा, जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे. ”

נדול ומלך ” हे परमेश्वरा ! महाराजा, माझ्या प्रकाशा व तारका, आपल्या सेवकाविषयीं माझ्या घायांमुळें न्यायांत जाऊं नको; आणि माझा सरळपणा मजविषयीं साक्ष देवो, परंतु माझें उल्लंघन व माझें पाप (साक्ष न देवोत) ”

ויקרא דבר ” परमेश्वराने हाक मारून म्हटलें कीं, याच दिवसीं तो तुह्मास शुद्ध करील; यासाठीं परमेश्वर सांपडेल त्या कालीं त्याला शोधा, आणि तुह्मी आपलीं वस्त्रें नव्हे, परंतु आपलीं मनें फाडा; आणि तुह्मी आपणाबरोबर सत्य मार्ग व वचनें घेऊन परमेश्वराकडे फिरा. ”

שמך למען עשה ” हे परमेश्वरा ! तूं आपल्या नामाकरितां माझा जीव अवश्य खंडून सोडीव, माझे अन्याय तर मझ्या डोक्यावरून पार गेले आहेत, आणि (त्यांची) संख्या

शेतांतील कोंबासारिखी अधिक वाढली आहे; याकारितां मी पुढें येऊन आपले दोष झांकीत नाहीं, परंतु ह्मणतों कीं, मीं आपलीं उलंघनें परमेश्वरापुढें कबूल होईन. ”

גמור בעדי ” परमेश्वर माझें कार्य सिद्धीस नेईल, मग मी मोठ्या मंडळीमध्यें आपलें गीत गाऊन त्याची स्तुति करीन; हे तारणाऱ्या, स्वामि व आमचे अन्याय धुळीस मिळविणाऱ्या, तो तुझ्या महान व भयंकर नामाचें स्तवन करील. मला माझ्या मोठ्या अतिक्रमाविषयीं निर्दोषी कर; हे परमेश्वरा ! तुझ्या जवळ माझ्या तोंडांतलीं, वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.”

חזק ויאמץ ” हे परमेश्वरा ! जे तुजवर भरंवसा ठेवितात त्यांस धैर्य देऊन धीट कर; परमेश्वरानें आमची आठवण केली आहे, तो इस्राएलाच्या घराण्याला आपला आशीर्वाद देईल; आणि परमेश्वर इस्राएलाचा पवित्र व त्याचा निर्माण करणारा ह्मणेल कीं, अहो परमेश्वराचे वाट पाहाणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें हृदय सबळ करील. ”

אתאנו לחלות आह्मी तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आह्मास लज्जित करूं नको, आतां आह्मास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आह्मी तुझ्या जवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आह्मास जीवंत राख, आह्मावर दया कर आणि तुझें नाम आह्मास ठेविलें जावूं दे; आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אבוא כעני मी तुझ्या दारीं दरिद्री सारिखा मागायास आलों आहें; आणि विनंती व काकळूत करून प्रार्थनेस आरंभ करितों; तर आतां आह्माकरितां तूं दयेचा दरवाजा उघड, आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אוחילה לאל मी देवाची वाट पाहीन, मी त्याच्या पुढें प्रार्थना करीन; त्यापासून मी जिभेचें उत्तर (वक्तृत्व) मागेन, कीं, त्याजकडून लोकांच्या समुदायामध्यें त्याच्या पराक्रमाविषयीं गाण्यास मी शक्तिमान होईन; त्याच्या आश्चर्य कृत्यांवरून मी हर्षानें कीर्तनें करीन; मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वराकडून जिभेचें उत्तर आहे.

אדני שפתי תפתח पुनः मोठ्यानें बोलते वेळीं מי כמוך पर्यंत झाल्यावर हें बोलतात.

ובכן נקדישך आणि हे राजा! याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानूं. दो. वे.

במרומי ערץ भयंकर उंचांत (आकाशांत) तुझ्या विश्रांतीचें आसन आहे; आणि पृथ्वीवरील वसणाऱ्यांमध्यें तुझ्या अधिकाराचें सामर्थ्य आहे; ते तुझ्या सौंदर्याच्या महत्वास सन्मानितात व हे तुझ्या राज्याच्या नामास पवित्र मानून ह्मणतात कीं, परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं. भयंकर आकाशांत त्याच्या स्तुतीचें आसन आहे, आणि त्याच्या पोशाकाच्या कोणाकडून मंदिर भरलें आहे; कांहीं उजव्याकडे व कांहीं डाव्याकडे असे सेराफीम त्याच्याजवळ उभे आहेत. आणि पृथ्वीवरील वसणारांमध्यें देवाला ओळखणारे लोक दरिद्र्याप्रमाणें मागायास आज उभे आहेत, ते उद्धारणाऱ्या व खंडून घेणाऱ्या खडकरूप आश्रयाची स्तुति करितात व त्यापुढें नमन करितात, आणि याकोबाचा पवित्र, इस्राएलाचा देव यास ते पवित्र मानितात. भयंकर आकाशांत महान दूत एकदाच (देवाच्या) भयानें निघून जातात व त्रासानें परत येतात, आणि एकच जो राजा त्यास कंपायमान होऊन सन्मानितात; त्यांतील प्रत्येकास सहा सहा पंख आहेत. आणि पृथ्वीवरील वसणाऱ्यांमध्यें आज समाजांचे समा-

ज पांच प्रार्थना * करीत तुजकडे येतात; आणि मोठ्या गजरानें देवाचा सन्मान करून ह्मणतात कीं, स्तवनामध्यें राहणारा तूं पवित्र आहेस. भयंकर आकाशांत सर्व शक्तिमानाचें नाम पूर्ण उच्चारिलें जातें; त्याकडून सर्व मनें घाबरतात व सर्व मांसमय थरथरतात; एका पाहाऱ्यावरील पाहारेकरी दुसऱ्या पाहाऱ्यावरील पाहारेकऱ्यांस विचारितात कीं, त्याचें ठिकाण कोठें आहे ? आणि याप्रमाणें ते एक प्रत्येकाला मोठ्यानें बोलतात. आणि पृथ्वीवरील वास करणाऱ्यांमध्यें कोरलेल्या नियमास वतन मानून घेणारे, आणि ज्यांस (ईश्वरानें आपली) पहिली संपत्ति असें स्वीकारून घेतलेले लोक त्याच्या नामास लगटून राहतात; आणि सैन्याचा परमेश्वर बळकट हातानें उंचाविला जातो, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितात. भयंकर आकाशांत दुतांचीं सैन्यें, आणि पृथ्वीवरील वास करणाऱ्यांमध्यें भविष्यकथनांच्या नियमाचें मनन करणारे, यांतून ते मोठ्या गजरानें त्यास सन्मानितात, आणि हे शेंकडो व हजारो त्याची पवित्रता गाजवून "पवित्र, पवित्र, पवित्र सैन्यांचा परमेश्वर आहे" असें ह्मणतात.

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

ארץ התמוטטה इस्राएलाच्या परमेश्वर देवापुढें पृथ्वी घाबरली व विशकलली; आणि देवाचे डोंगर हालले व कांपले. याकोबाच्या देवापुढें ध्रू व्याकुळ झाले; कडे थरथरले व डगमगून तुकडे झाले; आणि वांकडे मार्ग सरळ झाले. मोठ्या गजराची वाणी ऐकून ते चकित व दंग झाले, आणि भ्याले व घाबरले; कारण त्याच्या पुढें ते व्यग्र झाले. परमेश्वर देवापुढें उंच टेंकड्या उडाल्या, कुदल्या व झुकल्या, आणि त्यांस कंप सुटला व लटलटूं

* ערבית संध्याकाळची, שחרית पाहाटेची, מוסף अधिक, מנחה नैवेद्यरूपी आणि נעילה दरवार बंद होण्याच्या वेळेची प्रार्थना.

लागल्या. जेव्हां ईश्वरी पूर्ण नामाचें स्मरण मंडळांवर केलें तेव्हां तीं लोटत गेलीं; आणि जेव्हां टेंकड्यांवर केलें तेव्हां त्या हळूच उडाल्या; याविषयीं सैन्याच्या परमेश्वरापुढें सीनाय हा त्यावेळचा साक्ष व खूण असा आहे. याप्रमाणें ते भ्याले व आश्चर्य पावले, महाभय व त्रास यांनी त्यांस व्यापिलें; तुजसमोर जे उभे होते ते गलबलले; तुझ्यापुढें ते कांपले व भयभीत झाले. चार पशूंचीं *(प्राण्यांचीं) पावलें देवाच्या मार्गाकडे वळतात, ते आपल्या स्वामीपुढें हेव्यावांचून व कलहावांचून सेवा करितात. त्यांनी पाहिलें व ते भ्याले; अपधाकले व थरथर कांपले. आणि सूर्याचा फांकलेला प्रकाश त्यांच्या पुढें अंधारमय झाला. ते चिंतन व ध्यान करितात; आणि ज्या प्रभूला तुह्मी शोधितां त्याचा शोध ते पवित्र मंडळींत करितात. त्वरेंकरून ते जातात आणि अगदीं थांबत नाहींत; ते जवळ येतात आणि उगे राहत नाहींत; आणि जो पवित्रतेचा नैवेद्य ते पवित्र करून वाहतात, तो घेऊन ते जवळ येतात. ते भय धारण करून शंका धरितात; आणि धैर्य धरून आपल्या स्वतःस पारखतात; त्वरा करून न थांबतां एकवट होतात; आणि गजर करीत जवळ येतात; पवित्र मानितात व उगे राहत नाहींत; कांपतात व हालहालतात; आणि पवित्रांच्या मंडळींत सन्मानिलेल्या देवास सन्मानितात; आणि तीन वेळ (त्याची) पवित्रता गाजवितात.

כתר יתנו हे परमेश्वरा, आमच्या देवा, दूतांचीं वरील सैन्यें, खालीं एकवट झालेल्या तुझ्या इस्राएल लोकांसहित तुला मुगुट देतात (तुझा राज्याधिकार मान्य करितात.) आणि तुझ्या भविष्यवाद्याकडून ह्मटलेलें जें वाक्य आहे कीं, "ते एकमेकांला मोठ्याने बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे," त्याप्रमाणें ते सर्व एकदांच तीन वेळ तुझी पवित्रता गाजवितात. त्याच्या गौरवाकडून सर्व जग भरलें आहे; आणि त्याच्या गौरवाचें स्तवन करावें ह्मणून त्याची सेवा करणारे दूत त्याजविषयीं † विचारून शोध

* येहेजकेल अध्याय १ एथें सांगितलेले चार प्राणी ह्मणजे मनुष्य, सिंह, बैल व गरूड. † इ. त्याच्या गौरवाच्या ठिकाणाविषयीं.

करितात. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. त्याचे लोक त्याचें एकत्व मानून जे प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं असे दोन वेळा प्रीतीनें ह्मणतात कीं, "हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे; त्यांकडे तो आपल्या स्थानांतून दयेनें वळेल. तोच आमचा देव; तोच आमचा बाप; तोच आमचा राजा; तोच आमचा तारणारा; तोच आह्मास तारील आणि दुसऱ्या वेळीं आह्मास सोडवील; आणि सर्व प्राण्यांच्या दृष्टीपुढें दयेनें असें ऐकवील, कीं पाहा, मी परमेश्वर तुमचा देव तुह्मास देव असा व्हावा, ह्मणून पहिल्याप्रमाणें शेवटीं सोडविलें आहे. आणि तुझ्या पवित्र शास्त्रांतही लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढीपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

यापुढें אתה קדוש पासून ותתן לנו च्या शेवटपर्यंत वाचावें; आणि אלהינו ואלהי אבותינו पृष्ठ २. व עלינו לשבח भा. प. पृष्ठ ६१ एथपर्यंत वाचल्यावर हेखाल* उघडतात.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा ! तुझ्या इस्राएल लोकांवर दया व कृपा मागण्याकरितां तुझे लोक इस्राएल यांचें घराणें यांनी ज्यांस पुढें केलें आहे आणि जे आज तुजपुढें उभे आहेत; † त्यांच्या तोंडच्या वचनांबरोबर तूं ऐस. त्यांनी काय ह्मणावें तें त्यांस शिकीव; त्यांनी काय बोलावें तें त्यांस समजाव; त्यांनी काय मागावें तें त्यांस सुचीव; त्यांनी आपल्या वचनामुळें गळून पडूं नये. त्यांनी आपल्या उत्तरेंकरून लज्जित होऊं नये; आणि तुझ्या इच्छेप्रमाणें नाहीं असी कोणतीहि गोष्ट त्यांनी ह्मणूं नये; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा ! आह्मी जाणतों कीं, ज्यांवर तूं दया करितोस ते खचित दया पावतात; आणि ज्यांस तूं शिकवितोस ते खचीत शिकतात. जसें तुझा सेवक मोशे

* शास्त्राच्या प्रति ठेवण्याचें कपाट. † हज्जान.

याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं; "तेव्हां तो बोलला कीं, मी आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्यापुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

पूजनाचा प्रकार वाचून दाखविण्याचा व अधिक प्रार्थना करण्याचा अधिकार मागण्याची रिब्बी शेलोमो बेन गेबीरोल याने रचिलेली प्रार्थना.

ארוממך חזקי हे माझ्या सामर्थ्या व माझ्या विभागा! मोठ्या उत्कंठतेनें व तुझें द्वार ठोकीत, आणि आपली विनंती व काकळत करीत येऊन मी तुला गौरवितों; हे माझ्या यथार्थतेच्या देवा, जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे. मी सकाळीं व संध्याकाळीं तुला शोधितों, तूं माझी मनीं केलेली प्रार्थना व मोठ्यानें केलेली प्रार्थनाहि ऐक; आणि मी विनंती करितों कीं, मजकरितां मांडलेले फांस व जाळीं दूर कर; हे परमेश्वरा, फीर, आणि माझ्या जीवास सोडीव. मजवर दबा धरून राहणारीं व माझ्या टांचेजवळ असणारीं पापें दूर कर; माझ्या दु:खाचे व क्लेशाचे घाय तूं बांध; माझें हृदय व माझें अंत:करण तूं शुद्ध कर; आणि यथास्थित आत्मा मजमध्यें नवा कर. मी (आजच्या) दिवशीं लहानथोरांमध्यें उभा आहें; तर हे अनंता! माझें ताठरपण तूं दाबून टाक, म्हणजे मी नम्र होईन; मी आपले तळहात तुजकडे पसरितों व आपलें मुख तुजकडे लावितों; आणि माझें तोंड हर्षित ओठानी उत्साह करील. मजवरील जुलमामुळें ज्या दिवशीं माझे गुडघे नमले, त्या दिवसापासून माझी भक्ति व माझें पेय अर्पण बंद झालें; तरी अशा माझ्या दुर्दैवी स्थितीमध्यें मी आपल्या राजाची आशा करितों; तो परमेश्वर माझा देव, माझा अंधार प्रकाशित करील. मी जुलुमानें व फटक्यानें पिडलेला व जुलूम करणाराच्या व चाहाडाच्या हातून गांजलेला आहें; तरी जो माझें सामर्थ्य व माझा

हर्ष याकडे मी पाहतों; तोच मला सोडवील. पवित्र सुताचीं (विणलेलीं) वस्त्रें व मुख्य याजकाच्या कपाळावरील फूल, हीं नाशास गेलीं आहेत; नवा द्राक्षरस* व शिंपडण्याचें रक्तहि† नाहींसीं झालीं आहेत;‡ आणि ताट व गंगाळ यांचा उपयोग बंद झाला आहे; तरी मी ह्मणतों कीं, (हे देवा,) तूंच माझा आश्रय आहेस. मी सुगंधाबद्दल संबोधाचीं वचनें वाहतों, आणि माझें स्तवन करणें अर्पणाप्रमाणें मान्य कर; आणि माझी विनंती सुगंधित विंगळाप्रमाणें स्वीकार; (हे परमेश्वरा!) मी आपला आत्मा तुझ्या हातीं सोंपितों. हे माझ्या खडकरूप आश्रया व माझ्या दुर्गा! भक्तीचा व माझ्या मुख्य धर्माचा मार्ग मला शिकीव; आणि माझ्या मंडळीस तुझे प्रमाणनेम समजीव; हे प्रभू! माझी सर्व वांच्छा तुजपुढें आहे. हे थोर (ईश्वरा)! माझ्या पायास व माझ्या झेंड्यास आश्रय दे; जेव्हां मी अडखळतों, तेव्हां माझ्या अशक्ततेस व माझ्या दुर्बळपणास आधार दे; हे अनंता, माझ्या खडकरूप आश्रया, माझ्या दुर्गा व माझ्या निभावणाऱ्या, माझ्या पडण्यास व माझ्या नीचत्वास तूं उभार. माझ्या तुडविलेल्या मुगुटास तूं गौरवानें उंचाव. अर्पण करणाऱ्या उपाध्याच्या डोईवर पुनः तूं फेंटा (बांध); आणि जेव्हां मी विनंती व काकळूत करितों, तेव्हां माझ्या तोंडचीं वचनें मान्य होवोत. जसें लिहिलें आहे कीं, हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया! आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुझ्या जवळ माझ्या तोंडांतील वचनें व माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

---

* इ. द्राक्षाचें रक्त. यासारिखा लिहिण्याचा प्रकार उत्पत्ति अ. ४९ ओ. ११ एथेंहि सांपडतो.

† या शब्दाचा अर्थ कोणी सपीठाचें पेय अर्पण असाहि करितात.

‡ इ. दूर.

पूजनाचा प्रकार वाचून दाखविण्याचा व अधिक प्रार्थना करण्याचा अधिकार मागण्याची रिब्बी मोशे बेनयेजरा याने रचिलेली प्रार्थना.

אערוך מדברי דתי शास्त्रांतील शब्देंकरून पूजनाचा प्रकार मी सिद्ध करून रचितों; आणि मी आपलीं शब्दरूपी फळें वाहतों. कदाचित परमेश्वर मला भेटेल. या शोक करणाऱ्या लोकांपासून मी अधिकार घेतला आहे; त्या सर्वांविषयीं माझा जीव खिन्न होतो; मी बहकलों आणि माझे विचार गडबडले; कदाचित देवाच्या दिसण्यांत हें बरें होईल. त्यांनी सेवा करण्याचे स्तंभ उभारिले आहेत, ते आपलीं सरळ शब्दरूपी फळें वाहतात, आणि त्याच्या मूर्खत्वाचा निषेध होऊन त्याविषयीं वाद केला जातो; (कारण) कदाचित ते ऐकून फिरतील. पापामुळें आमची ताळू कोरडी पडती*, आह्मी आपलीं अश्रु शिंपडून पेय अर्पण करितों, आह्मी देवाजवळ आपला अंधार प्रकाशित करायास विनंती करितों; कदाचित तो आह्मास आमचा मार्ग कळवील. तुह्मी खिन्न आत्म्याने फिरा; काकळूत व विनंती करून (ईश्वरास) हाक मारा, आणि त्याजपुढें गायन व गीतें गा; कदाचित परमेश्वर सैन्याचा देव दया करील. तुह्मी आपले निद्रिस्त विचार जागृत करा, अज्ञान झोंपेंत असणारांस उठवा, आणि शोक करणाऱ्या व खेदीत मनास उंचावा; कदाचित देव आपणास प्रसन्न होईल. मी तुह्मा सर्वांपेक्षांहि लहान असतां, तुह्मा सर्वांकरितां प्रार्थना करायास उठलों आहें; आणि तुह्मास निषेध करायास मला बोलाविलें आहे; कदाचित मजकडून तुमच्या पापांचें प्रायश्चित्त होईल. अहो शुद्ध असणारानों !† तुह्मी आपल्या जीवांस सांभाळा, शुद्ध व्हा आणि आपल्या सर्व मनानें फिरा, तुमच्या दुष्ट वासनेकरितां शुद्ध (देवास) हाक मारा, कदाचित तो तुह्मावरून आपला हात हलका करील. मी

* इ. अंडकर्ता. † हें नाम लाक्षणिक भाषेनें चलमतीच्या लोकांस दिल्हेलें आहे.

आपल्या धन्यापुढें अगदीं हलका होतों, माझ्या गर्वाच्या भाराने मी कुजलेला आहें, तोंडचें उत्तर (प्रार्थना करण्याचें सामर्थ्य) मागण्याकरितां माझें तोंड उतरून जातें; परंतु कदाचित परमेश्वर माझ्या दृष्टीकडे पाहील. मी आपल्या गर्वाकरितां आपलें पृष्ठपण वाहतों, आणि आपल्या डोळ्यांतील अश्रू पेयअर्पणासारिखीं वाहतों, परमेश्वराने माझ्या मुखाबरोबर व माझ्या विचाराबरोबर असावें ह्मणून मी त्याची वाट पाहतों; कदाचित तो माझी विनंती मान्य करील. त्याच्या न्यायाच्या भयामुळें मला घाम सुटतो, त्यापुढें मी आपल्या पूर्वजांच्या पुण्याईची आठवण करितों, आणि नैवेद्याचीं फळें मी त्यापुढें आणितों, कदाचित त्यापुढें मला क्षमा मिळेल. त्याच्या दयेच्या समुदायास मी हाक मारिली, त्याच्या क्षमेच्या सैन्याची मी वाट पाहिली, आणि त्याच्या दयेच्या तेरा गुणांजवळ मी येतों; कदाचित परमेश्वर आपणाबरोबर आपलीं सर्व आश्चर्य कृत्यें करील. मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वराकडून जिभेचें उत्तर आहे. अणखी असें ह्मटलें आहे कीं, हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

पूजनाचा प्रकार.

אתה כוננת प्रारंभीं त्वां पृथ्वी स्थापन केली; जगाचा पाया घातला; (त्यांत) सर्व वस्तू उत्पन्न केल्या आणि त्यांत प्राणीमात्रही उत्पन्न केले. पृथ्वी अस्ताव्यस्त व शून्य आणि खोलवटीच्या पाठीवर काळोख असें त्वां पाहिल्यावरून, अंधार घालवून उजेड स्थापिला. आपल्या प्रतिच्छायेप्रमाणें मातीपासून एक गोळा * तूं घडिलास; आणि त्यास (बरें व वाईट) जाणण्याच्या झाडाविषयीं आज्ञा केलीस. त्याने तुझें वचन धिःकारल्यामुळें तोहि एदेन (बागेंतून) घालविला गेला; परंतु तूं आपल्या मंद

* प्रथम पुरुष आदाम.

क्रोधामुळें (हाताच्या कष्ट फळामुळें) त्याचा क्षय केला नाहींस. त्याच्या (पोटचें) फळ तूं वाढविलेंस, आणि त्याच्या संतानास आशीर्वाद दिल्हास; आपल्या चांगुलपणाकडून त्यास सफळ केलेंस व शांतीनें बसविलेंस (राहाविलेंस.) त्यांनी * तें जोकड मोडिलें (तो अधिकार उडविला;) आणि देवाला ह्मणाले, "आह्मापासून दूर हो." ह्मणून तूंहि आपल्या (दयेचा) हात त्यांजवरून आटोपलास, आणि एका क्षणांत त्यांचा गवताप्रमाणें नाश झाला. परंतु जो आपल्या पिढींत सरळ होता, † त्याकरितां करार आठवून, त्याच्या पुण्याईकरितां जगांत शेष राखिलास. त्याजबरोबर तूं धनुष्याचा करार केलास; आणि त्याच्या अर्पणाच्या आवडीवरून त्याच्या संतानास तूं आशीर्वाद दिल्हास. द्रव्यामुळें बहकून त्यांनी बुरूज बांधिला; आणि ह्मणाले कीं चला आपण चढूं, अंतराळ फाडूं आणि देवासीं लढूं. मग प्रख्यात मोठ्या राष्ट्रांचा बाप ‡ समोंवतालचा अंधार प्रकाशित करण्याकरितां एकदांच ताऱ्यासारिखा खासद्यांच्या ऊर गांवांतून प्रकाशला. त्याच्या वर्त्तणुकीवरून तूं आपला क्रोध मोडिलास (शांतविलास;) आणि त्याच्या ह्मातारपणाच्या वेळीं त्याचें मन पारखलेंस. दयेचा व कृपेचा शृंगार त्यापासून काढिलास; मेंढरांतून निवडून घेतलेला जो कोंकरा तो.§ त्याच्या मुळांतून एक सरळ पुरुष ‖ निघाला; तो उदरांतून निघण्यापूर्वींच करारानें मोहोर केलेला होता. त्यास बारा वंशज्यांस परात्पराचे प्रियकर व उदरांत असतां पाळलेले असें ह्मटलें आहे, ते दिल्हेस. त्यांतून लेवीवर दयेचा व कृपेचा शृंगार ¶ घातलास; आणि सर्व भावांमध्यें त्यास मुगुटमंडित केलेंस. त्या लेवीच्या कुळांतून आमरामास निवडिलें व त्याच्या मुळांतील आहारोन यास परमेश्वराचा पवित्र होण्याकरितां पवित्र (अभिषिक्त) केलास. पदवीच्या वस्त्रांकडून त्यास सुशोभित केलेंस व त्याच्या अर्पणाकडून

---

* ही प्रलयाच्या वेळची पिढी. † नोव्हा. ‡ आब्राहाम. § इसहाक.
‖ याकोब. ¶ ऊरीम आणि थुमिम.

तूं आपला राग मोडिलास (शांतविलास. तो जीं वस्त्रें पांघरीत असे, तीं येणेंप्रमाणे.—)

צִיץ וּמְעִיל सोन्याचें फुल, झगा, अंगरखा, चोळणा, उरपट, एफोद, फेटा, व कंमरबंद. * तो गोऱ्ह्याचीं अर्पणें, व मेंढ्याचे होम करीत असे, कोंकरें कापीत असे आणि एडके वेगळे करून ठेवीत असे. गंधाच्या मिश्रणाचा सुवास दाखवीत असे, इंगळ पेटवीत असे, रक्त शिंपडीत असे आणि तें (शिंपडणें) सरळपणें मोजीत असे. तो सुगंध, ती सत्य प्रार्थना, आणि त्याची पवित्रता, यांच्या मान्यते कडून आमच्या पापांचें प्रायश्चित्त होत असे. जवसांचीं वस्त्रें आणि हिरेजडित (एफोद;) या सर्वांकडून (ह्मणजे पांढऱ्या वस्त्रांकडून) सेवा करणाऱ्या दुतासारिखा तो वेष्टिलेला असे.

תִּכְּנַתְּ כָּל אֵלֶּה हें सर्व त्वां आहारोनाच्या गौरवाकरितां स्थापन केलें, इस्त्राएलाच्या प्रायश्चित्ताचें पात्र असा त्यास नेमिलें, आणि पापाच्या क्षमेचें साधन त्याच्या हातीं दिल्हें. आणि क्षमासाधनाच्या दिवशीं तुजपुढें सेवा करायास आहारोनाच्या ठिकाणीं त्याच्या कुळांतील एक मुख्य याजक नेमिला जात असे. आणि तो या दिवसाच्या पूजनाचे नियम व पूजनाची रीति आमच्या मंदिरीं सात दिवस शिकत असे; आणि तिसऱ्या व सातव्या दिवशीं (पोंवळी सांगोपांग कालवडीची राख पाण्यांत मिश्र करून) त्याजवर शिंपडीत असत. †

שְׁלוֹמֵי זִקְנֵי עָם लोकांतील वृद्धांमध्यें जे सरळ ते व त्यांचे भाऊ जे उपाध्ये, यांतील सुज्ञ जन दाहाव्या दिवसापर्यंत नेहमी त्याभोंवतें असत.

(וְעֶרֶב יוֹם הַכִּפּוּרִים प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या आदल्या

---

* टीका १

† हें गणना १९. या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें करीत; याचें कारण असें कीं, कदाचित न कळतां त्यास प्रेताचा स्पर्श झाला असला तर त्यापासून त्यानें शुद्ध व्हावें; व त्याच्या शुद्धतेविषयीं कांहीं संशय राहूं नये.

दिवशीं सकाळीं त्या मंदिरीं जो वास करीत असे, त्याच्या नामानें त्यास शपथ देत असत; कीं, त्यानें मनांत कांहीं कपट राखून ज्या गोष्टी त्यांनी त्यास सांगितल्या त्यांतील एकहि त्यानें पालटूं नये. परंतु त्यांनी त्याजवर आळ घेतला, ह्मणून तो वेगळा जाऊन रडत असे; आणि ज्यांचीं कामें गुप्त अशांवर त्यांनी आळ घेतला, ह्मणून तेहि वेगळे जाऊन रडत; परंतु त्याच्या मनांत कांहींच नसेल ह्मणून त्यास याप्रमाणें ह्मणत.—)

ראה לפני מי "पाहा ! तूं कोणासमार जात आहेस; प्रज्वलित अग्नीच्या ठिकाणीं (तूं जात आहेस); आपली सर्व मंडळी तुजवर आधार धरून आहे; आणि तुझ्या हातांकडून आह्मा सर्वांस आज क्षमा मिळणार आहे." आणि पूजनाच्या प्रकाराची त्यास आठवण (वहिवाट) राहावी, ह्मणून दाहाव्या दिवसापर्यंत त्यास आज्ञा करून या कामांत वहिवाटवीत. अवघे सात दिवसपर्यंत तो रक्त शिंपडीत, दिवे नीट करीत, सुगंध दाखवीत व वधलेले मेंढ्याचें डोकें व पाय (स्थंडिलाजवळ) आणीत असे; आणि प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या आदल्या दिवशीं सकाळीं पूर्वेकडील दरवाज्यांत त्यास उभा करून गोऱ्हे, एडके व मेंढे त्या समोरून चालवीत.) प्रतिदिवसाचा मेंढा कापण्याचा वेळ जवळ आला ह्मणजे विभाग करण्याकरितां एक त्याच्या व लोकांच्या मध्यें एक सणाचा पडदा ताणीत. मग तो आज्ञा दिल्याप्रमाणें मोठ्या काळजीनें व भयानें अंघूळ करून अंघूळ करितांना अंगास कांहींच केर डसला नाहीं ह्मणून मोठ्या चौकशीनें पाही;* नियमाप्रमाणें ही आज्ञा पूर्ण झाल्यावर तो आनंद करी. आणि मग इतर दिवसांचीं वस्त्रें काढून खालीं उतरून सुचविल्याप्रमाणें पहिली अंघूळ करी व वर येऊन अंग पुशीत असे. मग ते त्यास सोन्याचीं वस्त्रें देत, तीं तो पांघरून आपले हात व पाय (सोन्याच्या झारीनें) धूत असे.

מיד מקבל मग तावडतोब प्रतिदिवशीं अर्पिला जाण्याचा मेंढा घेऊन त्याचे दोन सस † कापून, कापण्याचें काम पूर्ण

---

* टीका २. † या दोन ससांची नांवें קנה ह्मणजे श्वास घेण्याचा सस, आणि ושט ह्मणजे अन्नपाण्याचा सस.

करण्यास दुसरा उपाध्या नेमून आपण एक घेऊन आज्ञेप्रमाणें स्थंडिलावर शिंपडीत असे. सकाळीं पांच दिवे नीट करण्यास, सुगंध दाखविण्यास आणि राहिलेले दोन दिवे नीट करण्यास तो देवळाच्या आंतल्या बाजूस जाई; आणि बाहेर आल्यावर आज्ञेप्रमाणें त्या मेंढ्याचें डोकें व अवयव अर्पीत असे. मग नित्याप्रमाणें प्रतिदिवसाचा नैवेद्य व भाजलेल्या मासाचा नैवेद्य दाखविल्यावर द्राक्षरस चांगल्या भांड्यांत ओती.

शा. अ. हेंहि बोलावें.

וּבְיוֹם הַשַּׁבָּת (शाब्बाथ दिवशीं विधीप्रमाणें दोन अधिक मेंढे अर्पण करून त्यांचा नैवेद्य दाखवी, दर्शनीय भाकरी सिद्ध करी, आणि सुगंधाच्या चूर्णाचे दोन चमच्यांचा सुगंध दाखवीत असे.)

וְאַחַר כָּךְ या (नित्याच्या होमानंतर) गोऱ्ह्याचा, आणि या दिवसाच्या अर्पणाचे सात मेंढ्यांचा होम करून विधिप्रमाणें त्यांचा नैवेद्य दाखवी व पेय अर्पण करी.

יָבֹא מִיָּד मग तावडतोब परवा* यानें बांधलेलें घर, जें पवित्र कामाकरितां निराळें असे, तेथें तो आल्यावर पूर्वीप्रमाणें त्याच्या व लोकांच्या मध्यें पहिल्याप्रमाणें एक सणाचा पडदा ताणीत; परंतु त्यानें आपणावरील सोन्याचीं वस्त्रें काढल्याअगोदर आपले हात व पाय धुवून शुद्ध करी. नंतर सोन्याचीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी आणि वर येऊन अंग पुशीत असे. मग सोन्याचीं वस्त्रें काढून पांढरीं वस्त्रें घाली, कारण या दिवसाचें पूजन पांढरीं वस्त्रें घालून करावें असा विधि होता. नंतर तो त्वरा करून आपले हात व पाय धुऊन स्वच्छ करी; आणि पहिल्यानें आपल्या गोऱ्ह्याजवळ † येई. हा त्याचा गोऱ्हा उत्तरेस देवडीच्या व स्थंडिलाच्या मध्यें उभा असून त्याचें डोकें दक्षिणेकडे; आणि त्याचें तोंड पश्चिमेकडे असे; तो याजक पूर्वेकडे उभा असे, आणि त्याचें तोंड पश्चिमेकडे असे; आणि मोठ्या भयानें परात्पर देवापुढें उभा राहून

* टीका ३. † हा गोऱ्हा त्याच्या व त्या कुटुंबाच्याच प्रायश्चित्तासाठीं असे.

त्या (गोऱ्ह्यावर) आपल्या पापाविषयीं कबूल होत असे. तें येणेंप्रमाणें.—

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, मी व माझ्या कुटुंबानें तुजपुढें पाप केलें, अपराध केला व उलंघन केलें आहे. हे देवा, मी व माझ्या कुटुंबाने तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उलंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उलंघनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, " कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापापासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील".

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत; तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मी शुद्ध व्हा.

ואתה בטובך (तूं आपल्या चांगुलपणाकडून आपली दया जागृत करितोस, आणि सात्विकांस क्षमा करितोस.)

דרך ובא मग तो तेथून निघून अंगणाच्या पूर्वेस व स्थंडिलाच्या उत्तरेस जो नीकानोराचा दरवाजा* होता तेथें येई. त्याच्या उजव्या बाजूस दुयम उपाध्या,† आणि डाव्या बाजूस उपाध्याच्या घराण्यांतील मुख्य असत; तेथें दोन कोंकरे असत; त्यांचीं तोंडें पश्चिमेकडे व त्यांचीं पृष्ठें पूर्वेकडे; त्यांतील एक उजवेकडे व एक डावेकडे असे. मग लागलाच तो (आपले दोन्ही हात) एका पेटींत घालून त्यांतून दोन सोडती‡ काढी. जी ईश्वरी ना-

* टीका ४. † टीका ५. ‡ टीका ६.

माची सोडत असे, ती उजव्याकडील कोंकरावर टाकून ह्मणे कीं, हा ईश्वरी नामाचा दोषहारक यज्ञ. याप्रमाणें ईश्वरी नाम घेतांना जे ऐकत ते ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

कित्येक ठिकाणीं हें पुढील ह्मणत नाहीं.

והכהנים והעם जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत, तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

בשעיר עזאזל आझाझेलाच्या* कोंकराच्या शिंगांमध्यें दोन सेला वजनाचा किरमिजी दोरा† बांधीत असे, आणि त्यास पूर्वेकडील दरवाज्यांत त्यास पाठवायाच्या ठिकाणासमोर उभा करीत असे. आणि जो ईश्वरी नामाचा कोंकरा असे, त्याच्याही गळ्यांत ज्या ठिकाणीं त्यास कापायाचा त्या ठिकाणीं किरमिजी दोरा बांधीत असे. आणि मग दुसरे वेळीं तो आपल्या गोऱ्ह्याजवळ येऊन आपलें, आपल्या कुटुंबाचें व आपले बंधु उपाध्ये यांचें पाप कबूल करीत असे. तें येणेंप्रमाणें.—

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, मी, माझें कुटुंब व तुझे पवित्र लोक आहारोनाचे पुत्र, आह्मी पाप केलें, अपराध केला व उलंघन केलें आहे. हे देवा, मी विनंती करितों कीं, मी, माझें कुटुंब व तुझे पवित्र लोक आहारोनाचे पुत्र, आह्मी तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उलंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उलंघनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापापासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील."

* टीका ७ † टीका ८.

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत; तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मीं शुद्ध व्हा.

ואתה בטובך (तूं आपल्या चांगुलपणाकडून आपली दया जागृत करितोस, आणि आपली सेवा करणाऱ्या वंशास क्षमा करितोस.)

אחר וכו׳ याप्रमाणें (पापें) कबूल केल्यानंतर आपला व लोकांचा पापहारक यज्ञ करण्याकरितां स्वतः त्वरा करी; सुरा चौकस तपासून आपला गोऱ्हा कापी, आणि त्याचें रक्त एका शुद्ध प्याल्यांत धरी; आणि तें जमूं नये ह्मणून पवित्र ठिकाणाच्या चौथ्या फरसबंदीवर हालविण्याकरितां आपल्या जवळच्या मनुष्याजवळ लागलेंच देत असे, आणि ज्याच्या हातीं तें रक्त हालविण्यास देत असे, त्याच्याच हातीं ठेवून तांबड्या सोन्याचें, हलकें, ज्याचें वजन तीन काब,* आणि ज्याची आकृति रुंदट, असें एक धुपाटणें घेऊन स्थंडिलाच्या शिखरावर चढून, त्या स्थंडिलाच्या पश्चिम बाजूस जे इंगळ असत त्यांतून घेत असे. मग ते प्रज्वलित अग्नीच्या इंगळानीं भरलेलें धुपाटणें खालीं आणून अंगणाच्या चौथ्या फरसबंदीवर ठेवी. मग त्याजवळ एक रिकामें ताट व अति बारीक कुटलेल्या सुगंधानें भरलेलें धुपाटणें आणीत; त्यांतून तो आपली ओंजळ भरून घेई; तें असें कीं, ना उणें ना अधिक भरलेलें; परंतु योग्य रीतीनें भरून मोठ्याच्या मोठ्या ओंजळीप्रमाणें व लाहानाच्या लाहान ओंजळीप्रमाणें घेत असे. तो सुगंध ताटांत ठेवून तें इंगळानीं भरलेलें धुपाटणें डाव्या हातीं आणि सुगंधाचें ताट उजव्या हातीं धरीं नंतर तो त्वरेनें अति पवित्र ठिकाणीं जाऊन तें धुपाटणें कोशाच्या काठ्यांच्या मध्यें

* काब एक प्रकारचें तोल आहे.

ठेवी; (परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं शेथीया या नांवाच्या दगडावर ठेवीत असे.)* आणि त्या ताटाचा कांठ बोटांच्या शेवटांनी किंवा दांतांत धरून, जसें पूर्वी ओंजळ भरलें होतें, त्याप्रमाणें पुनः भरेपर्यंत सुगंध आंगठ्याने घेऊन आपल्या ओंजळांत ओतीत असे. मग तो सुगंध मुठींत घेऊन पश्चिम बाजूच्या इंगळावर तो (सर्व) टाकून, तें सर्व ठिकाण† धुराने भरे तोंपर्यंत तेथें थांबत असे.

מהור לב जो मनाचा शुद्ध तो (डोळे झांकून) माघारें पाऊल टाकून परत येई, तेव्हां तो पडद्याच्या बाहेर येई तोंपर्यंत त्याचें तोंड पवित्र ठिकाणाकडे व पाठ मंदिराकडे असे. ‡ आणि मंदिरांत तो एक लहानसी प्रार्थना करीत असे.

कित्येक ठिकाणीं मुख्य उपाध्याची प्रार्थना एथें वाचितात व कित्येक ठिकाणीं पूजनाच्या प्रकाराच्या शेवटीं वाचितात.

וכך היתה תפלתו मुख्य उपाध्या मंदिरांत असतां जी प्रार्थना करीत असे ती येणेंप्रमाणें.—

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होऊं दे कीं, आह्मावर व तुझे लोक इस्राएल ज्या ज्या ठिकाणीं असतील, त्या सर्वांवर हें येतें वर्ष असें होवो कीं, उष्णता झाल्यास पर्जन्याची वृष्टि होवो; आणि जेव्हां पर्जन्याचें सर्व जगास अगत्य असतें, तेव्हां कोणी वाटसराने त्याविषयीं प्रार्थना केल्यास ती तुजपुढें न येवो; तुझे लोक इस्राएलाचें घराणें याने एक प्रत्येकाजवळ किंवा अन्य लोकांजवळ अन्नाविषयीं गरजवंत होऊं नये; या वर्षी स्त्रीच्या पोटच्या फळाचा पात होऊं नये, शेतांतील झाडानी आपले उत्पन्न द्यावें, आणि यहूदाचे घरांतून राज्यकारभार न जावो.

יצא ונטל דם הפר (बाहेर) निघाल्यावर ज्याच्या

---

* टीका ९ † इ. घर.

‡ या वाक्यांत पवित्र ठिकाण आणि मंदिर हीं नांवें जीं आहेत, त्यांवरून अति पवित्र ठिकाण व पवित्र ठिकाण असे समजावें. कोठें कोठें त्या ठिकाणास या वाक्यांत लिहिल्याप्रमाणेंहि नांवें सांपडतात. अति पवित्र ठिकाण हें पवित्र ठिकाण ज्याला या वाक्यांत मंदिर असें ह्मटलें आहे, त्याच्या पलिकडे आंत असे.

हातीं गोन्ह्याचें रक्त हालविण्यास दिल्हें असें, त्याच्या जवळून तें रक्त घेऊन, ज्या ठिकाणीं तो गेला होता त्याच ठिकाणी पुन: जाऊन, ज्या जागीं उभा राहिला होता तेथेंच उभा राहून, प्रत्येक वेळीं तो आपलें बोट त्या रक्तांत बुडवून तें पेटीच्या काठ्यांमधील दयासनाच्या समोर शिंपडीत असे. तें असें; एक वेळ वर व सात वेळ खालीं. परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडेस त्याचें लक्ष नसे, परंतु जसा कोणी मारायास हात वर करतो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)*

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.† अतिपवित्र ठिकाणांतून बाहेर आल्यावर मंदिरांत एक सोन्याची बैठक असे त्यावर तो तें ठेवी.

כצתו तेथून बाहेर आल्यावर ईश्वरी नामाचा दोषहारक यज्ञाचा कोंकरा त्याजवळ आणीत, त्यास कापून त्याचें रक्त एका शुद्ध प्याल्यांत धरी. (आणि) ज्या रीतीनें गोन्ह्याचें रक्त शिंपडलें त्याप्रमाणें, ह्मणजे एक वेळ वर व सात वेळ खालीं त्या रक्तांतून शिंपडण्याकरितां (पुन:) आंत जात असे. परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे. जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात. आणि पवित्र ठिकाणांतून बाहेर आल्यावर मंदिरांत दुसरी सोन्याची बैठक असे त्यावर तो तें ठेवी.

---

* टीका. १०

† वरील एक वेळ शिंपडणें खालच्या सात वेळ शिंपडण्यांत मोजिलें न जावें ह्मणून तो याप्रमाणें मोजीत असे.

מִידָה तें कोंकराचें रक्त तेथें ठेविल्यानंतर त्वरेनें सोन्याच्या बैठकीवरून गोऱ्ह्याचें रक्त घेऊन, सोन्याच्या वेदीच्या व पडद्याच्या मध्यें उभा राहून, बाहेरून कोशासमोर त्या पडद्यावर तें शिंपडीत असे; एक वेळ वर व सात वेळ खालीं; परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे, जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וְכָךְ הָיָה מוֹנֶה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.

נִהַץ मग तें गोऱ्ह्याचें रक्त ठेवून लागलेंच तें कोंकराचें रक्त घेऊन तें बाहेरून कोशासमोर त्या पडद्यावर तें शिंपडीत असे; एक वेळ वर व सात वेळ खाली; परंतु वर किंवा खाली शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे; जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וְכָךְ הָיָה מוֹנֶה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.

שֵׁשׁ וְעֵירָה मग हर्षानें तें गोऱ्ह्याचें रक्त त्या कोंकराच्या रक्तांत ओती; परंतु तें चांगलें मिसळलें जावें ह्मणून तो भरलेला प्याला पुनः त्या रिकाम्या प्याल्यांत ओतून आंत येऊन सोन्याच्या वेदी (जवळ) त्या वेदीच्या आणि दिव्याच्या झाडाच्या मध्यें उभा राहत असे.

וּמַתְחִיל לְהַזּוֹת मग तो त्या मिसळलेल्या रक्तांतून (वेदीच्या) चार शिंगांवर त्यांच्या अनुक्रमानें ह्मणजे ईशानीचा शिंगावर शिंपडायास आरंभ करून आग्नेयी शिंगावर संपवीत असे. त्यांतील शेवटील शिंपडणें जें वरून खालीं असे, त्याखेरीज दुसरें सर्व शिंपडणें खालून वर असें. यानंतर तो सोन्याच्या

वेदीवरील इंगळ व राख तिचे सोनें दिसेपर्यंत इकडे तिकडे सारून त्या मिसळलेल्या रक्तांतून वेदीच्या निर्मळ भागावर दक्षिण बाजूस, जेथें शिंगावर रक्त शिंपडणें पूर्ण झालें, तेथें तो सात वेळ शिंपडीत असे. मग पुढें पाऊल टाकून, आणि खांबाच्या बाहेर दक्षिण बाजूस येऊन तें उरलेलें रक्त बाहेरल्या वेदीच्या पश्चिमेकडल्या पायावर ओतीत असे. नंतर आझाझेलकडे जो कोंकरा पाठवायाचा त्याज-वळ येऊन त्याजवर मंडळीचे अतिक्रम कबूल होऊन ह्मणत असे (तें येणेंप्रमाणें.)

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांनीं तुजपुढें पाप केलें, अपराध केला व उलंघन केलें आहे. हे देवा, मी विनंती करितों कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांनीं तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उलंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उलं-घनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिव-शीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील."

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांत पवित्रतेने व शुद्धतेने देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत, तेव्हां ते गुडघे टेंकून नम-न करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्यांच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मी शुद्ध व्हा.

קרא לאחד मग उपाध्यांतील एक ज्यास आदल्या दिवशींच आमंत्रण केलेलें असे, त्यास बोलावून तो कोंकरा ओसाड देशांत उजाड रानांत नेण्याकरितां त्यांच्या स्वाधीन करीत असे. तो कड्याजवळ पोहोंचल्यावर त्या कोंकराच्या शिंगाच्यामध्यें जो

किर्मिजी दोरा असे, तो सोडून अर्धा खडकास व अर्धा त्याच्या शिंगांच्या मध्यें बांधून मागून त्यास दोन हाताने लोटून देत असे. तो लोटत खालीं जात असे; परंतु तो अर्ध्या डोंगराच्या खालीं गेला नाहीं, इतक्यांत त्याचे तुकडे तुकडे होऊन जात. तेव्हां तो (संगातें गेलेला उपाध्या) ह्मणे कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांचे आतिक्रम असेच नाहींसे होवोत.

ודרכיות (तो कोंकरा रानांत पोहोंचला असें (देवळांत) समजण्याकरितां मोठाल्या दगडाचे गडगे रचून त्यांवर बावटे उडवीत असत.)

ריץ ובא मग जो गोऱ्हा व जो कोंकरा जाळिला जाणार व ज्यांचें रक्त शिंपडलें गेलें, त्यांजवळ धावत येऊन, त्यांस फाडून त्यांचें मांदें वेदीवर जाळण्याकरितां एका पात्रांत काढून ठेवी; आणि त्यांचें मास आकड्यावर टांगून दुसऱ्याच्या हातून जाळायाचे ठिकाणीं * पाठवी. मग तो कोंकरा रानांत पोहोंचल्यानंतर परतून तो स्त्रियांच्या अंगणांत येऊन शास्त्र वाचिल्यापूर्वी करायाचा धन्यवाद करी;† आणि אחרי מות व‡ בעשור§ या भागांत उपाध्यांचा जो विधि आहे तो वाचल्यानंतर, तें शास्त्र गुंडाळून आपल्या उरासीं धरी आणि ह्मणे कीं, मी तुह्मांपुढें जें वाचिलें त्यापेक्षां त्यांत अधिक लिहिलेलें आहे. आणि ज्या भागांत यादी केली आहे, त्यांतील ובעשור ‖ हें तो मुखपाठ बोलत असे. मग शास्त्र वाचल्यानंतर जो धन्यवाद करायाचा † तो करून त्याजवर अणखी सात ह्मणजे भक्तीविषयीं, स्तुतीविषयीं, पापाच्या क्षमेविषयीं, पवित्र स्थानाविषयीं, इस्राएलाविषयीं, उपाध्याविषयीं आणि उरलेल्या प्रार्थनेविषयीं धन्यवाद करी. मग तो आपलें पाऊल अंघूळ करण्याच्या ठिकाणाकडे वळवून तो आपले हात व पाय धूत असे. आणि

---

* हें जाळायाचें ठिकाण यरुशालेम नगराच्या बाहेर असे.

† हा धन्यवाद भा. प. पृष्ट १०६ एथें सांपडतो.

‡ लेवीय १६.१

§ लेवीय २३.२७ ‖ गणना. २९.७.

पांढरीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी आणि वर येऊन अंग पुसल्यावर त्याजकडे सोन्याचीं वस्त्रें आणीत; तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे. तिकडून निघून आजच्या अधिक अर्पणाचा कोकरा, जो बाहेर अर्पिला जात असे, तो अर्पी.

ואחר כך מקריב यानंतर तो आपल्या एडक्याचें व लोकांच्या एडक्याचें अर्पण करी. मग दोषहारक यज्ञाचें मांदें जाळी; मग त्या दोन एडक्यांचा त्यांच्या नेमाप्रमाणें नैवेद्य दाखवी; मग सर्व अधिक अर्पणाचें त्यांच्या विधीप्रमाणें पेय अर्पण करी; मग नित्याचा संध्याकाळचा होम त्याच्या रीतीप्रमाणें करी.

אחר כלותו हें सर्व काम संपल्यावर तो पुन: अंघूळ करण्याच्या ठिकाणीं येऊन आपले हात व पाय धूत असे. मग सोन्याचीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी, आणि वर येऊन अंग पुसल्यावर त्याजकडे पांढरीं वस्त्रें आणीत; तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे, आणि सकाळीं जें धुपाटणें व जो प्याला ठेविला होता, तो आणण्याकरितां अति पवित्र ठिकाणीं जाई. (तिकडून परतल्यावर) तो पुन: अंघूळ करण्याच्या ठिकाणीं येऊन आपले हात व पाय धूत असे, मग पांढरीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी, आणि वर येऊन अंग पुसल्यावर त्याजकडे सोन्याचीं वस्त्रें आणीत; तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे. मग तो मंदिरांत जाऊन संध्याकाळचा सुगंध दाखवी.

ויצא והקריב तिकडून निघून तो नित्याचा नैवेद्य आणि भाजलेले मांसाचा व पेयअर्पणाचा नैवेद्य त्यांच्या विधिप्रमाणें करून दिवे पेटविण्याकरितां आंत जात असे. (बाहेर येते समयीं) नमन करून निघे आणि आपले हात व पाय धुवून सोन्याचीं वस्त्रें काढून ठेवी. मग त्यास त्याच्या स्वतांचीं वस्त्रें आणून देत, तीं त्यानें पांघरल्यावर (इस्राएलांतील मुख्य व वडील) त्यांस घरापावेतों पोहोंचवीत; आणि पवित्र ठिकाणांतून तो सुखरूप निघाला

ह्मणून त्याचे आप्त व प्रियलोक (दुसऱ्या दिवशीं) मोठा सण * करीत असत.

कित्येक ठिकाणीं एथपर्यंत वाचल्यावर हेखाल उघडतात; आणि मागें लिहिलेली मुख्य उपाध्याची प्रार्थना एथें वाचितात.

אשרי העם ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. यास्तव ज्याप्रमाणें मंदिरांत त्वां मुख्य उपाध्याची प्रार्थना ऐकिली; त्याच प्रमाणें आमच्या तोंडची ही प्रार्थना ऐक व आमचें तारण कर.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होऊं दे कीं, आह्मावर व तुझे लोक इस्राएल ज्या ज्या ठिकाणीं असतील, त्या सर्वांवर हें येतें वर्ष प्रकाशाचें, आशीर्वादाचें, आनंदाचें, हर्षाचें, गौरवाचें, चांगल्या मंडळीचें, कीर्तनाचें, उल्हासाचें, चांगुलपणाचें, दहिंवर व पर्जन्य आशीर्वादरूप होतील असें, तारणाचें, अन्नाच्या पुरवठ्याचें, अभ्यासाचें, विश्रांतीचें, सांत्वनाचें, प्रेमाचें, उत्साहाचें, खंडणीचें, खुशालीचें, मोकळीकिचें, पाडाव नेलेले एकवट होण्याचें, प्रार्थना मान्य होण्याचें, प्रसन्नतेचें, कल्याणाचें, संवगाईचें, तूं मोकळेपणीं आह्मास आमच्या देशीं नेशील असें, (इतर) लोकांवर आह्मास जय देण्याचें, आह्मास चांगल्या जिवनाकरितां लिहिण्याचें, तुझे लोक इस्राएलाचें घराणें याने एक प्रत्येकाजवळ किंवा अन्य लोकांजवळ अन्नाविषयीं गरजवंत होऊं नये असें, आह्मावरून व तुझे लोक इस्राएलाचें घराणें याजवरून पटकी व नाश दूर होतील असें, आणि स्त्रीच्या पोटच्या फळाचा पात न व्हावा असें होऊं दे.

"ועתה आणि आतां हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या अपार दयेवर आह्मी भरंवसा ठेवितों; तुझ्या कृपेचा आम्ही आश्रय धरितों; आणि तुझ्या क्षमेची आह्मी आशा करितों; कारण तूं दयाळ व कृपाळू, मंदक्रोध व फार ममतेचा आणि पुष्कळ चांग-

* पश्चिम हिंदुस्थानांतील बेने इस्राएल लोक प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशीं अद्याप जो सण करितात, तो याच गोष्टीच्या आठवणीकरितां स्थापिला असावा असें अनुमान होतें.

लें करणारा परमेश्वर देव आहेस, आणि या सर्व जगतास तूं आपल्या कृपेच्या व दयेच्या गुणांकडून चालवितोस; जसें तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "तेव्हां तो बोलला कीं, मी आपलें सर्व बरेंपण तुझ्या पुढें चालवीन, आणि तुझ्या पुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

एथपर्यंत वाचल्यावर हेखाल बंद करितात.

ובכן מה נהדר आणि मुख्य उपाध्या जेव्हां पवित्र ठिकाणांतून बाहेर निघे, तेव्हां त्याचें तेज याप्रमाणें किती सुंदर असे! जसा (राजाच्या डोईवरील) टोपास जडलेला विचित्रक; जसा मुगटांत बसविलेला आरक्तक; जसा एफोदावर दिसणारी पाच; जसा ऊरपटावर दृष्टीस पडणारा हिरा; जसें सप्तर्षींसारिखें लखलखणारें मणिरत्न; जसा संगमरवराच्या खांबामध्यें बसविलेला गोमेद; जसा सोन्यांत बसविलेला बिलोर; जसा मोहोरीवर बसविलेला पीतमणी; जसें अति तेजस्वी चकचकणारें माणीक; जसें अतिशय चमकणारें पोवळें; जसा पूर्ण तेजानें प्रकाशणारा चंद्र, जसा गौरवानें उगीवणारा सूर्य; जसा आकाशांतील तार्‍यांच्या मध्यें रवि, परमेश्वराच्या दुतासारिखा पवित्र (असें त्याचें तेज असे). जसें लिहिलें आहे कीं, याजकाच्या ओंठांनीं ज्ञान राखावें, आणि त्याच्या मुखांतून (लोकांनीं) नेमशास्त्र शोधावें; कां कीं तो सैन्याच्या परमेश्वराचा दूत आहे.

אשרי עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא למשמע אזן मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!*

शारोनांतलें † कमल जें जसा द्विणकरीचा गळेबंद गळा वेष्टितो त्याप्रमाणें गौरवानें वेष्टिलेलें होतें तें, आणि (ऊरपटावरील) आठ-

* इ. कासावीस होत नाहीं काय? † हें एका सुपिक प्रदेशाचें नाम आहे.

वर्णाच्या मोलवान दगडानें, आणि आहारोनाचीं जीं पवित्र वस्त्रें, त्यांकडून शृंगारलेला याजक ज्या नेत्रानें पाहिला तें धन्य. הלא

लेवी व (इस्राएल) लोक यांस बोध होतांना, आणि तेजस्वी अग्नीच्या ज्वालेसारिखें त्यांवर पाखर घालणारें गौरव, आणि तुह्मी आपल्या सर्व पापांपासून परमेश्वरासमोर शुद्ध व्हा, असें याजक ह्मणत असतां, त्याजकडे लोक उत्कंठतेनें धांव घेतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

देवालय पूर्ण सौंदर्यानें भरलेलें, आणि जसें लग्नसमारंभांत राजावर तसें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजकाच्या मुखांतून ईश्वरी न उच्चारायाचें नाम निघतांना, आणि त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम धन्य असो, असें लोकांस ह्मणतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

मंदिराचें सुंदरपण व महत्व, आणि जसा राजा आपल्या माहालांत तसें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजक शोभायमान होऊन प्याला व धुपाटणें आणितांना, आणि यानंतर जसा सूर्य गौरवानें उगवितो त्यासारिखा बाहेर निघतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

प्रियमंदिराची भिंत, आणि शुक्राच्या तेजासारिखें आणि ज्वालेसारिखें तिजवर पाखर घालणारें गौरव, आणि याजकाच्या (मुखांतून) पर्जन्यवृष्टीसारिखा निघणारा बोध, आणि दुसरे याजक व लोक, त्याच्या भोंवतें जाईताच्या रोप्यासारिखे उभे ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

राजाचा सुंदर वाडा, आणि राजाच्या डोईवरील मुगुटासारिखें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजक इकडे तिकडे गंभीरपणें चालतां, आणि जसा राजाचा सन्मान करण्याकरितां तसे दुयम याजक व पुष्कळ लोक त्याच्या मागें चालतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

किर्मिजाचा दोरा लखलखीत पांढरा होतांना, आणि अन्न पाणी वर्जणाऱ्या (लोकांवर) पाखर घालणारें गौरव, आणि उंचा-

वर वस्ती करणाऱ्या (देवाकडून) क्षमा झाली असें सांगणारा, आणि ज्याचें स्वरूप देवाच्या दूतासारिखें अशा याजकास ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

אשרי עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें एकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

गौरववान व महत्ववान याजक प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि झग्यासारिखा सौंदर्यानें वेष्टिलेला; आपल्या कामावर उभा राहण्याकरितां आपल्या पदवीचीं व शोभायमान आठ वस्त्रें * पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्याचें सुंदर लकलकीत स्वरूप प्रफुल्लित प्रकाशानें भरलेलें, आणि त्यासमोर मार्ग सरळ होतांना, नीच नव्हे परंतु थोर लोकांमध्यें विपरीत न्यायाचें प्रायश्चित्त करण्या करितां ऊरपट पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

तो प्रायश्चित्त करण्याकरितां गंभीरपणें येतांना, आणि जसा सूर्य गौरवानें उगवितो तसा प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि मूर्त्ति पूजनाचें प्रायश्चित्त करण्याकरितां आणि सुशोभित मुगुटाकरितां एफोद पांघरून पवित्र मंदिरांत जातानां ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्या (अधिकाऱ्यास) महान राष्ट्राच्या समाजामध्यें ज्योती सारिख्या किंवा ज्वालेसारिख्या प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि रक्तपाताचें प्रायश्चित्त करण्याकरितां अतिशुद्ध लोकांमधून अंगरखा पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्या कीर्तिमान याजकास (ईश्वरी) गुप्त आत्मा पावलेला, आणि तेजस्वी सूर्यासारिखा प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि अभिमानी आत्म्याच्या दोषाचें प्रायश्चित्त करण्याकरितां फेटा बांधून, त्यांस अधिक शोभा चढून पवित्र मंदिरांत जातानां ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

* टीका. ११

त्याच्या कंबरेस सुंदर कंबरबंद, आणि तो पाहांटच्या फांकले-ल्या उजेडाप्रमाणें प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला असतां, (तो कंबर-बंद बांधून) कुकल्पनेच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याकरितां; आणि नागवेंपण उघडें करण्याच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याकरितां मा-सावर (पायांत) चोळणा घालून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्याच्या झग्याच्या सभोंवतें घुंगरू, आणि तो प्रफुल्लित प्रकाशा-नें भरलेला असून यथायोग्य उपदेश सांगत असतां, आणि सत्यशी-ल लोकांमध्यें (सोन्याचें) फूल (फेंट्यावर लावून) झगा पांघरून ह्मणजे कपटाचे भाषणाच्या प्रायश्चित्ताकरितां झगा घालून आणि निर्लज्जेचें प्रायश्चित्त करितां फूल लावून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

אשרי־עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

रमणीय देश आणि (त्यावरील) एकच (विख्यात) राष्ट्र आणि मुख्य याजकास सोन्याच्या एकच (विचित्र) वस्त्रांनीं वेष्टिले-ला ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आमच्या पाडाव-पणांत या नेमिलेल्या एकच दिवशीं, आमच्या देवास शो-धण्याकरितां, आणि एकमेळीं त्याची सेवा करण्याकरितां त्वरा करितों. הלא

दोघां दुयमांचें * उभें राहण्याचें ठिकाण, आणि मुख्य याज-क दोन कोंकरांवर सोडत टाकतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मीं आपल्या पाडावपणांत दोन राष्ट्रांच्या देशांत प्रवासी आहों, आणि देवाच्या नामाचें एकत्व मान्य करायास आह्मी द्विगुणें † आलों आहों. הלא

* मुख्य याजक दोन कोंकरांवर नीकानोराच्या दरवाजाजवळ येऊन सोडत टाकीत असतां त्याच्या उजवेकडे जो दुयम याजक आणि डावेकडे याजकाच्या घराण्यांतील मुख्य असत ते. † टीका १२

तीन अर्पणें,* होतांना, आणि मुख्य याजक तीन वेळ पापें कबूल करितांना ज्या नेत्राने पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपल्या पाडावपणांत तीन शब्देंकरून† आमच्या उत्पन्न करणाऱ्याची प्रसन्नता मिळविण्याकरितां आणि तीन वेळ त्याची पवित्रता गाजविण्याकरितां त्वरा करितों. הלא

चार पूजनांचें माहात्म्य‡ आणि सोन्याचीं चार वस्त्रें§ ल्यालेल्या मुख्य याजकाचें सुंदर स्वरूप ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपल्या पाडावपणांत (पृथ्वीच्या) चोहों कोनीं विखरलेले आहों, आणि जरी चौघां राजांचे¶ जोकड आह्मी वाहिलें, तरी आह्मी (ईश्वरी) नाम विटाळलें नाहीं. הלא

पांचवेळ अंघूळ करण्याचें ठिकाण, आणि मुख्य याजक यास पांच सुंदर पात्रांकडून ‖ सेवा करितांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपले पाडावपणांत आजच्या दिवशीं पांच गोष्टी × वर्ज करून पांचवेळ प्रार्थना करितों. הלא

ובכן היה לאין यास्तव या सर्व गोष्टी नाहींत, ह्मणून त्या पाहण्यास सर्वांचे डोळे उत्कंठित झाले आहेत. परंतु आमच्या अपराधांमुळें व आमच्या पूर्वजांच्या अपराधांमुळें आमचे वसतिस्थानाचा नाश झाला; आणि आमच्या तारणाचा वेळ लांबविला आहे; तरी त्या गोष्टींच्या स्मरणांकडून आह्मास प्रायश्चित्त दे; आणि आज आह्मी आपल्या जिवास दुःख लावून घेतलें आहे, ह्मणून आह्मास क्षमा होवो.

---

* पाहाटचे अर्पण अधिक अर्पण व संध्याकाळचें अर्पण;

† ותמחול आह्मास क्षमा कर; ותסלח आह्मास माफ कर; ותכפר आह्मास प्रायश्चित्त दे, या शब्देंकरून; अथवा तीन वेळ पापें कबूल होऊन.

‡ चार जातीच्या पशूचें ह्मणजे गोऱ्हा, एडका, मेंढा व बकरा यांचें अर्पण.

§ फुल, एफोद, ऊरपट, आणि झगा ज्यास सोन्याचे घुंगरू असत तो.

¶ बाबेलो, पारसी, ग्रीक व रोमी.

‖ पांच वेळ पालटलेलीं वस्त्रें.

× अन्न, पाणी, अंघूळ, सुवास, जोडा घालणें व योग.

ועתה יי אלהינו आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा, आतां आमचे पवित्र मंदिराचा नाश झालेला आहे; आणि पूजन मना झालें आहे; आणि तुजपुढें प्रगट व उघड आहे कीं, आह्मा-करितां दोषहारक यज्ञ नाहीं व (ईश्वरास) वाहण्याचीं दानेंहि नाहींत, कोंशाच्या काठ्या नाहींत व मळलेलें पीठहि नाहीं, (कोंकरांवरील) सोडत नाहीं व अग्नीचे इंगळहि नाहींत, मंदिर * नाहीं व (सुगंध) बारीक कुटण्याचा प्रकारहि नाहीं, पवित्र ठिकाण नाहीं व मोर डोंगरहि नाहीं, (देवळापुढें जमा होणारा इस्राएलांचा) समाज नाहीं व ईश्वरी न उच्चारायाच्या नामानें पापें कबूल होण्याचा प्रकारहि नाहीं, यज्ञ नाहीं व रक्त शिंपडणेंहि नाहीं, पापहारक यज्ञ नाहीं व जाळायाचें यांदेंहि नाहीं, शुद्ध हो-ण्याचा प्रकार नाहीं व अंघूळ करण्याचा प्रकारहि नाहीं, यरूश-लेम नाहीं व लेबानोनाचें रानहि नाहीं, दयासन नाहीं व केरूबहि नाहींत, ऊद नाहीं व दर्शनीय भाकऱ्याहि नाहींत, स्थंडिल नाहीं व दिव्याचें झाडहि नाहीं, (अर्पिलेल्या पशूचे) तुकडे करण्याचा प्रकार नाहीं व पेयअर्पणहि नाहीं, सपीठ नाहीं व (सुगंधी) द्रव्येंहि नाहींत, होम नाहीं व पूजनहि नाहीं, पडदा † नाहीं व पापहारक यज्ञाचा गोऱ्हाहि नाहीं, सियोन नाहीं व पवित्र फूलहि नाहीं, तजाचा सुगंध दाखविणें नाहीं व दालचिनीचा सुगंध दाखविणेंहि नाहीं, सुगंधी द्रव्याचा सुवास नाहीं व शांतिकारक सुवासहि नाहीं, ईश्वरापुढें आणायाच्या भेटी नाहींत व शांतिकारक यज्ञहि नाहीं, आभार मानण्याचे यज्ञ नाहींत व नित्याचीं अर्पणेंहि नाहींत.

אבל נתת לנו परंतु हे परमेश्वरा आमच्या देवा, त्वां आह्मास हा (शा. अ. शाब्बाथ दिवस व हा) प्रायश्चित्ताचा दिव-स, हा अपराधाची क्षमा होण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळ-ण्याचा दिवस, हा दिवस ज्या (दिवशीं) खाणें, पिणें, अंघूळ

* एथें मंदिर हें नाम अति पवित्र ठिकाणास दिलें आहे. जसें १राजे ६, १९.
† पवित्र आणि अतिपवित्र ठिकाणाच्या मध्यें जो पडदा होता तो.

करणें, अंगावर सुवास घेणें, जोडा घालणें, आणि योग मना आहेत तो, वर्षांतील सर्व दिवसांपेक्षां हा मोठा दिवस, ज्या दिवशीं तूं आमचीं सर्व पापें क्षमा करितोस, आमचे अपराध माफ करितोस, आणि आमचीं उल्लंघनें दूर करितोस, तो दिल्हा आहेस. जसें तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील (आणि) तुह्मी शुद्ध व्हाल. आणखीं असें ह्मटलें आहे कीं, "तुह्मी आपणांबरोबर वचनें घेऊन परमेश्वराकडे फिरा, त्याजवळ ह्मणा कीं, तूं सर्व अन्यायांची क्षमा कर, आणि (आह्मास) प्रसन्न हो; ह्मणजे आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पूं."

שׁמם הר ציון आमच्या पूर्वजांच्या अपराधामुळें सियोन डोंगर ओसाड पडला; आमच्या मंडळीचें प्रायश्चित्त करण्यासाठीं पवित्र मंदिर नाहीं व याजकहि नाहीं, ह्मणून आमच्या अर्पणाबद्दल आह्मी प्रार्थना * आणिली आहे ; आणि आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पितों.

ונשלמה आणि आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पितों.

חרב מקום שבתי माझ्या वस्तिस्थानाचा नाश झाला; माझें सुंदर घर ओसाड पडलें, ढगाप्रमाणें असणारा माझा सुगंधाचा (धूर) नाहींसा झाला; आणि माझ्याजवळ स्थंडिलहि नाहीं. (हे देवा,) तुझ्या जवळ येण्याकरितां प्रार्थनेवांचून माझ्याजवळ कांहींच उरलें नाहीं; जसी नेमलेल्या मनुष्याबरोबर रानांत कोकरा पाठवून पापाची क्षमा होत असे, तसी माझ्या लाजीरवाण्या फितुरीची क्षमा कर. तूं आह्माकडे वळून आह्मावर दया कर, आणि आमचे अन्याय धुळीस मिळीव. ונשלמה

עם נדפם ונדלה नीचावलेले व पीडलेले लोकांस, हे चांगल्या व क्षमाशील देवा, तूं प्रसन्न हो; आणि जसा मीठ घालून निर्मळ केलेला सुगंध, तसी त्यांची विनंती सफळ होऊं

* इ. वचनें.

दे, त्यांच्या सर्व कुजट अपराधांकरितां प्रायश्चित्त पाठीव, आणि जसीं कड्यावरून लोटलेल्या कोंकराकडून, तसीं त्यांचीं पापें क्षमा कर; प्रसन्नतेच्या वेळीं आह्मास उत्तर दे, आणि आमचें दुःख तूं धिक्कारूं नको. ונשלמה

אָנָּא הָאֵיר אורנו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमचा उजेड तूं प्रकाशित कर, आमचें मंदिर तूं बांध, आमच्या आश्रयाच्या ठिकाणाभोंवतालें तूं कुस बांध, आमचा झेंडा तूं उभार, आमच्या मंदिरास तूं सजीव, आह्मावर तूं प्रकाशित हो आणि आह्मास तार, (आमची मंडळी तूं एकवट कर,) आमचा उन्मत्तपणा तूं क्षमा कर, आमचीं पापें तूं माफ कर, आमचा विटाळ तूं शुद्ध कर, आह्मापुढें मांडलेले फांस तूं मोकळे कर, आह्मावरील डाग तूं धुऊन टाक, आमचें मन तूं सुशिक्षित कर, आमचे अतिक्रम तूं क्षमा कर, आमची आशा तूं स्थापन कर, (आमचा आत्मा तूं शुद्ध कर,) आमची विपरीत वर्त्तणूक तूं माफ कर, आमचे अपराध तूं दूर कर, आमचीं उलंघनें तूं रद्द कर, आमच्या सैन्यास तूं यथार्थ ठरीव, आमच्या मंडळ्या तूं उभार, आमच्या मनीं चांगल्या गोष्टींच्या निघणाऱ्या उकळास तूं प्रसन्न हो, आमची विनंती तूं मान्य कर, आमची प्रार्थना तूं ऐक, आमच्या काकुळतीची आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणें यांच्या प्रार्थनेची तूं आवड धर.

אָנָּא מחול לעונותינו भा. १. पृष्ठ. १७

וידוי पापाविषयीं कबूल होणें.

एथें पापाविषयीं कबूल होण्याविषयीं जो भाग आहे तो वाचितात, परंतु त्यांतील רבונו של עולם बद्दल हें पुढील बोलतात.

आरटुतीएल याचा पुत्र रब्बेनु शेमतोब याने रचलेलीं पापें कबूल होण्याची रीति.

רבונו של עולם हे जगदीशा, जेव्हां मी आपल्या ता-

रण्याकडे पाहतों तर पाहा, त्याचें तेज निघून गेलें, आणि माझी प्रतिमा छायेसारिखी आहे, आणि माझ्या आयुष्याच्या पुष्कळ वर्षांमुळें माझीं पापें किरमिजासारिखीं लाल, आणि माझे कुरळ केंस बर्फासारिखे पांढरे झाले आहेत. माझ्या वांच्छांस अनुसरण्यांत आणि आज्ञांचा भंग करण्यांत तीं (वर्षें) लयास गेलीं, आणि माझी निराशा होऊन तीं समाप्त झालीं. (हे देवा,) तुझ्या मागून चालणें सुधारण्यासाठीं आणि पश्चात्ताप करण्यासाठीं माझ्या अंगीं पुर्तेपणा नाहीं, म्हणून माझी निराशा झाली. कारण दिवस लहान असून कामें पुष्कळ आहेत. मीं स्तुतीचें अर्पण * केव्हां अर्पूं ? आणि ज्या गोष्टींविषयीं मीं हट्ट धरिला त्यांविषयीं मंडळींत व सभेंत माझें तोंड केव्हां कळवील ?माझ्या (आयुष्याच्या) थोडक्या वेळांत मीं केलेले पापांविषयीं व अपराधांविषयीं कसा कबूल होऊं शकेन ? आणि त्यांचीं नांवें आपल्या ओंठानीं कशीं घेऊं शकेन ? तीं सांगायास शब्द व बोल पुरणार नाहींत, आणि तीं लिहिल्यास पुस्तकांत व (पटांच्या) गुंडाळ्यांतहि तीं मावूं शकणार नाहींत; (लिहितां लिहितां) दिवस व रात्रि संपून जातील. जरी लिहिलीं व सांगितलीं, तरी माझ्या कबूल होण्यांतून दाहापट उरून राहतील. जर मी सुंदर ओंठानीं व ऐकविणाऱ्या वाणीनें माझ्या उल्लंघनांविषयीं क्षमा मागूं पाहतों, तर (माझ्याजवळ) बरें तें काय ? सुंदर तें काय ! जर दुर्भाषणाच्या दोषाविषयीं सांगायास मी आपले ओंठ उघडतों, आणि दुर्वचनें बोलण्याविषयीं मृदु शब्दानें मी विनंती करितों; तर पाहा, ज्या तोंडानें योग्य गोष्टी ठरविल्या, त्याच तोंडानें अयोग्य गोष्टी ठरविल्या आहेत. एवढेंच नाहीं, परंतु ओंठांच्या शब्देंकरून रक्तानें भरलेले हातांस, आणि जुलमी तळहातांस काय लाभ ? आणि जीं पापें (मजपासून) घडून आलीं व येतात, आणि जीं मी करीत व चालवीत आहें, त्यांसाठीं अगे कपटी जिभे, तुला काय दिल्हें जाईल ? आणि तुला

* תודה या शब्दाचा अर्थ स्तुति असा होतो आणि कबूल होणें असाहि होतो.

काय प्राप्त होईल ? दाहा वेळा जरी पापें कबूल केलीं, तरी दुष्टाईच्या संग्रहास कांहींच हित होणार नाहीं, आणि शब्दांच्या पांडित्याने* उलंघनें नाहींसीं होणार नाहींत. जीभ आणि ओंठ हालवून ओंवाळणीसाठीं परमेश्वरासमोर ओंवाळणी केल्याने कांहीं उपाय व आरोग्यता होते काय ? मन तर द्वेषभाव राखतें, आणि ओंगळ विचार योजितें. मी न जाणून केलेल्या पापाकरितां जरी आपलीं अश्रु वितळवून तुजपुढें पावसासारिखीं पाडिलीं; तरी जें पाप मी हट्टानें केलें आहे, त्याकरितां मला न्यायांत उभें राहावें लागणार नाहीं कीं काय ? अथवा जें पाप मी तुजपुढें अगत्यामुळें केलें, त्याकरितां जरी आश्चर्य (कृत्यें) करणाऱ्या हाताकडून होणाऱ्या क्षमेची आशा केली; तरी तुजपुढें स्वइच्छेने केलेल्या पापाकरितां मला आत्मिक व दैहिक † दंड नाहीं काय ? जरी गुप्तांत केलेले पापाकरितां मी विनंती करितों व ती मान्य केली जाते; तरी तुजपुढें उघडपणें केलेल्या पापाकरितां माझें मन भयंकर अग्नींत भाजत नाहीं काय ? अथवा जर मी ह्मणतों कीं (तुझा) क्रोध जाईपर्यंत मी पळून जातों, तर त्यांताहि कांहीं रुचि नाहीं, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरलेली नाहीं काय ? त्याच्या हातून कोणी वांचत नाहीं, आणि नरकाहि त्यासमोर उघडा आहे. (हे देवा,) तुजसमोरून मी कोठें पळूं शकेन ? तुझ्या दृष्टीपुढून कांहींच लपलें जात नाहीं. जर आकाशांत चढतों तर तूं तेथें आहेस, किंवा मृत्युलोकीं आथरूण धरितों, तर पाहा, तेथेंहि तूं आहेस. यास्तव निश्चयें, मी मौन धरितों व मुका राहतों, आणि आपला हात तोंडावर ठेवितों; कारण मला लज्जा प्राप्त झाली आहे व मी घाबरलों आहें. माझ्या मनास भय प्राप्त होऊन तें कांपतें, आणि माझे विचार थरथरून व डगमगून, योग्य व अयोग्य गोष्टींविषयीं संशययुक्त आहे; त्यांतून कोणतें खरें हें मी जाणत नाहीं. जरी मी उभा राहायास अथवा पळायास पाहतों,

* इ. अधिकाईनें.

† इ. आंतील व बाहेरील.

किंवा भय अथवा विश्वास धरितों, तरी दोन विचारांमध्यें मी लंग-डतों. जर आठवण करितों अथवा मनांतून घालवितों, बोलतों, अथवा उगा राहतों, तर तीहि गोष्ट कठीणच आहे. कारण उगा राहिलों असतां माझीं हाडें झिजून जातात, आणि बोललों असतां माझे अपराध उघडकीस येतात; आणि माझ्या मागल्या आयुष्यामुळें माझें मन फजीत पावतें. जर मी आपल्या हृदयांत (अपराध) लपवून पाहतों, आणि माझें कपट मजमध्येंच राखून ठेवितों, तर माझा तोंडवळा मजविषयीं साक्ष देतो. आणि जो गुप्त गोष्टीचा शोध लावणारा न्यायाधीश आहे, त्यापुढें विसर पडणें, तोंडओळख धरणें आणि लांचाची आवड धरणेंहि नाहीं. आणि जिवाची खंडणी किती अमोलिक आहे! असें असतां मी गरीब व भिकारी आहें; मग मी शुद्ध कसा होईन. यावरून माझें डोकें लव्ह्याप्रमाणें लवतें, आणि माझीं अश्रुं माझ्या काळिजाच्या रक्तानें लाल झालीं आहेत; आणि जसें काळेंजिरीं व जिरीं पेरि-तात, त्याप्रमाणें तीं विखरलेलीं आहेत. यद्यपि माझ्या गुर्दे कमळांनीं बोध करून, आणि माझ्या विचारांनीं मला उत्तर करून धैर्य दिल्हें; ते मला ह्मणाले कीं, जरी न्यायाधीश भयंकर व कठोर आहे, तरी दिवस अद्याप आहे (अवकाश आहे) इतक्यांत तूं आपल्या जीवाची खंडणी शोध. तूं दयेविषयीं निराश होऊं नको; कारण अद्याप दिवस वर आहे आणि पूर्ण दिवसाप्रमाणें मावळायास त्वरा करीत नाहीं. तुझा अर्ज मान्य व्हावा, ह्मणून तुझ्या आरोळीसाठीं स्थान व्हावें आणि तुझ्या प्रार्थनेसाठीं द्वार उघडलें जावें ह्मणून तूं काक-ळूत कर. जरी तुझीं दुष्ट कर्में फारच वाढलीं, तरी देवाची क्षमा-शीलता किती चांगली व किती मोठी आहे! आणि जरी तुझीं पापें समुद्र व त्यांच्या लाटांसारिखीं आणि तुझे अतिक्रम आकाशांतील तारे व त्यांच्या सैन्यासारिखे असले; तरी ईश्वराची दया अनंतकाळापासून आहे, जरी तुझे दोष तुझ्या हातावर वाढून पुष्कळ झाले असले; तरी आकाशावरून त्यांची दया सत्तरपट होईल. असें ते मजबरोबर बोलत असतां माझ्या ठिकाणीं मी

उगाच उभा राहून धैर्य धरिलें, आणि (हे देवा,) मी तुझा दरवाजा ठोकीत आहें. आणि माझ्या पापांच्या कांहीं भागांविषयीं कबूल होण्यास माझ्या दोषांतून एकादा लहान आणि माझ्या हजारों अतिक्रमांमधून एकादा सांगायास मी आपलें हृदय भरलें आहे. मी अतिक्रम केले, माझ्या जुलमाच्या व दग्याच्या अतिक्रमांचीं ओझ्यांचीं ओझीं आहेत. मी विश्वासघात केला, आणि रात्रंदिवस मी आपणावरून मळीण कापडें काढिलीं नाहींत. मी लुटलें आणि त्याची फेड करायास मी शकलों नाहीं; कारण लुटून खालेलें परत देणें कठीण आहे. जसा कोणी मूर्ख बोलतो, तसा मी कपटी व थट्टेखोर जिभेनें आळ घेतला. मी विपरीत केलें, आणि जें सरळ होतें, तें मी आपल्या तोंडानें वांकडें केलें, निश्चयें मी त्याला उलटून, उलटून, उलटून ठेविलें आहे. मी दुष्टाई केली आणि माझा जीव आनंदित व हर्षित झाला; परंतु दुष्टांचा मार्ग कां सफल होतो? मी उन्मत्त झालों; आणि उन्मत्तपणें जो तंटे व झगडे करितो त्यावर मी प्रीति केली. मी बळात्कार केला; आणि ज्यानें बळात्कार केला नाहीं अशा यथार्थाची आपल्या तोंडानें अपकीर्ति केली. मी खोटें रचिलें, आणि खोटी साक्ष देण्याकरितां गुलामाप्रमाणें मी विकला गेलों. मी वाईट योजिलें; आणि माझ्या पवित्राची (देवाची) आज्ञा मोडायास मी आपल्या जिवासीं विचार केला. मी लबाडी केली; आणि खोटेपणा व लबाडी बोलण्याविषयीं माझें मन पाण्याच्या झऱ्यासारिखें वाहतें. मी थट्टा केली; आणि माझ्या मनानें मसलत देणाऱ्यांचा विवेक मोडला, त्यानें (मी) निंदकांसीं आपला हात लांब केला (संगत केली.) मी बंडावा केला आणि "निश्चयें तुह्मी परमेश्वराविषयीं केवळ विरुद्ध करूं नका." हें वाक्य मी अपल्या हातानें सर्व पुस्तकांतून काढून टाकिलें. मी अपवाद केला; आणि माझ्या मनानें प्रगटपणें व गुप्तांतहि लोभी, ज्याचा परमेश्वराला वीट आहे त्यास, मी धन्य ह्मटलें. मी कुटिलपणें वर्तलों, आणि सर्व मनुष्यांनीं अनिवार व्हावें ह्मणून मी त्यांस चेतविलें. मी दोष केले; आणि जें वांकडें केलें, तें नीट करण्यास

माझ्या मनाने गर्वेकरून नाकारिलें. मी उलंघन केलें; आणि उलंघन करणाऱ्या मनुष्यांस माझा शेजारी होण्यासाठीं मी निवडून घेतलें. मी जुलूम केला; आणि जुलूम करणाऱ्या वैऱ्यासारिखा आपल्या स्वतःस थोर करून सर्व मनुष्यांवर जुलूम केला. मी आपली मान ताठर केली; आणि ताठर गोष्टी बोलण्यापासून मी कधीं उगा राहिलों नाहीं. मी दुष्टाई केली; आणि माझ्या जीवाने उलंघनांच्या व दुष्टाईच्या मार्गे शोध करणाऱ्या दुष्टाची ईर्षा धरिली. मी नासलें; व जें मजकडून नासलें गेलें, तें माझ्या दिसण्यांत थोडेंच होतें, आणि ज्या नाश करणारासहि उत्पन्न केलें आहे. मी ओंगळ केलें; आणि चिळसकारक कृत्यें करायासाठीं माझा जीव फार इच्छेने भंगला जातो. मी बहकलों; आणि मेंढपाळ नसल्यास शेरडूं जसें भटकतें, तसें माझें मन भटकत आहे; आणि तें कोणाएकाला असें आढळतें कीं, पाहा, तें बहकलें आहे. मी (दुसऱ्यास) बहकविलें, आणि सर्व धार्मिकांस मूर्ख समजून त्यांस बहकविण्याकरितां त्यांजसीं भाषण केलें; परंतु मी त्यांस ठकविणारा असा दिसलों. आणि मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून मला कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें मजवर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस, त्वा सत्यता केली आहे, परंतु मी दुष्टाई केली आहे. निश्चयें मी जाणतों, कीं तूं कृपाळू व दयाळू आहेस, संकटाविषयीं अनुतापत असतोस, आणि आपलें चांगुलपण कधींहि आवरीत नाहींस; जें मी ऐकिलें आहे, त्यापेक्षांहि तूं अधिक दया करितोस. तूं मंद्रक्रोध व बहुप्रसाद आहेस; ह्मणून तुजपुढें (दया) मागणाऱ्याच्या तोंडास रिकामें परतवूं नको; तूं त्यांचें हृदय सिद्ध करून ऐक. मी स्वभावाने दुराचारी आहें, तसेंच हे पवित्रामध्यें व अतिपवित्रामध्यें भेद राखणाऱ्या, तुला क्षमा करणें शोभतें. मी दोष व दुष्टाई करणारा आहें, परंतु हे देवा, तूं यथार्थ व तारणारा आहेस; ह्मणून तुझी विनंती करीत असतां तारण व्हावयास आज्ञा कर. आणि बंडखोरांच्या व उद्धट मनुष्याच्या लज्जेवरून दयेची स्तुति कळून येती. जर अतिक्रम करणाऱ्या-

स लज्जा प्राप्त न होती, तर दयेचें मूल्य समजून न येतें; तीं दोन्हीं एकदांच संपतीं. जर (तुजपासून) फिरण्यांत अपवित्रता होत नसती, तर पश्चात्तापाची शुद्धता किती व किती चांगली हें कळून न येतें. जर दुष्कर्मांचा नाश करायास व त्याचा चिळस मानायास क्षमेची आशा नसती, तर दुष्ट मनुष्यें वाढलीं असतीं. यास्तव जरी माझीं उलंघनें व दुष्कर्में पुष्कळ झालीं आहेत, तरी माझें दुःख व माझे कष्ट पाहून माझ्या शोकांत मला क्षमा होवो. जरी माझीं पापें व बंडें वाढलीं असतील, तरी माझ्या कष्टाचें व माझ्या नीचत्वाचें स्मरण कर, आणि माझ्या जवळ कांहींच नाहीं हें लक्षांत आण.* मधंपेक्षां गोड काय? आणि सिंहापेक्षां बळकट काय? (याचा शोध केला तर असें कळून येतें कीं,) माझ्या पशुवत् जिवाची आवड गोड वाटते, आणि माझ्या दुर्वासनांचें सामर्थ्य मोठें आहे. परंतु क्रूर जन आपले देहावर दुःख आणितो. माझें ज्ञान त्यांपुढें कोल्ह्यासारिखें, आणि माझा बुद्धिमंत आत्मा मुक्या मेंढराप्रमाणें असतो; परंतु त्या पशूंमध्यें बळकट जो सिंह त्यासारिखा आहेत. मातीचा केलेला मनुष्य लबाडीची व ठकविण्याची इच्छा करितो. सर्वहि लांचेची आवड धरितात, त्यांतील प्रत्येकास चार चार तोंडें आहेत. आपल्या गरजा शोधण्यासाठीं (पुरविण्यासाठीं) तो वांकड्या मार्गानें जातो, आणि आपलीं शिक्षित मानसेंही हत्यारबंद करितो. त्याचे घरीं चौघे † जन्मलेले आहेत; ते प्रत्येक आपल्या मार्गानें भटकतात; कधींहि ते तृप्त होत नाहींत. प्रत्येक आपल्या भावाबरोबर लढतो, त्यांतून फारसे ज्ञानी होत नाहींत, त्यांचे विचार निरनिराळे आहेत, ह्मणून ते नाश पावतील. एकाच्या ज्ञानाचा आश्रय व एकाच्या बुद्धीचा आधार ते धरीत नाहींत; ते चालतांना त्यांच्या चोहों अंगानें चालतात. ‡ एक चुलींतून विस्तव घ्यावयास व दुसरा डबक्यांतून पाणी उपसायास इच्छितो, ते चपळ जहा-

* इ. माझ्याजवळ काय आहे तें तूं ओळख.

† मनुष्य चार तत्वांचा ह्मणजे अग्नि, पाणी, वायु व माती यांचा केलेला आहे.

‡ प्रत्येक आपल्या विचारानें चालतो.

जासारिखे क्रमून जातात. एक मगरासारिखा वारा झोंकितो, दुसरा घरोव्याकरितां खांच खणितो, त्यांनी मजकडे (देवाकडे) आपलें तोंड नाहीं, परंतु पाठ फिरविली आहे. एक दबा धरून राहतो, व दुसरा पाठीस लागतो; एक नाशितो व दुसरा फाडितो; आणि प्रत्येक आपल्या शेजाऱ्याला धोंड्याने अथवा बुक्कीने मारितो. ते अतिविपरीत पिढींतले व कुसावांचून मोडलेले नगरासारिखे आहेत; मी शांत असतों, * परंतु जेव्हां बोलतों तेव्हां ते लढूं लागतात. विघात व नाश त्यांच्या वाटांत आहेत, आणि त्यांच्या गतींत कांहीं नीति नाहीं; त्यांनी पाहूं नये ह्मणून आपले डोळे मिटले, आणि समजूं नये ह्मणून आपलें हृदय झांकिलें आहे. जर मी त्यांच्या पायावर बांधलेला नसतों, † तर मी बंडावलों नसतों; (नीतीच्या मार्गापासून) मी मागें हटलों नसतों. निश्चयें, माझ्या अंतर्यामास लज्जा प्राप्त झाली आहे; तें मजमागें मोठ्याने ओरडतें कीं, माझ्या पापामुळें हें सर्व झालें आहे. प्रत्येक आपणास थोर मानून ह्मणतो कीं, मी राज्य करीन; एक विनंती करितो व दुसरा फुसलावतो; तर मी काय करावें हें मी जाणत नाहीं. लांडग्यांमध्यें शेरडूं काय करूं शकेल? एक बहुधा समोर उभा राहूं शकेल काय? एका पक्षांत एक व दुसऱ्या पक्षांत बहुत असल्यास बहुमताप्रमाणें वर्तावें असी रीति आहे. यावरून मला अगत्य पडलें होतें असें लक्षांत आणून तूं मला माझ्या कुटिलपणापासून आणि अतिक्रमापासून सोडीव, आणि आतां माझीं पापें क्षमा कर. माझे अपराध माफ कर, आणि माझ्या उल्लंघनांविषयीं व माझ्या उद्धटपणाविषयीं मला सुटका दे. आणि जर मजसाठीं असें करीत नाहींस, व जर माझें दुःख तूं धिःकारितोस, (परंतु असें न होवो, जरी माझ्या पापाच्या गडबडीमुळें माझ्या काकुळतीची वाणी बंद राहते, तरी पराक्रमी देव ती धिःकारणार नाहीं;) तर या पवित्र मंडळीसाठीं माझी विनंती मान्य कर. त्यांतील प्रत्येक लहान थोर, पुष्ट व शुष्क

* शांति राखूं पाहतों.

† जर मी त्या चार तत्वांचा घडलेला नसतों.

(तुजपुढें) विनंतीरूप पाणी शिंपडीत आहेत. ते आपल्या ओठां-
चीं प्रार्थनारूप वासरें अर्पितात, आणि खबुतरांच्या बदल काक-
ळूत करितात, आणि तुजपुढें कबूल होतात.

यापुढें पापाविषयीं कबूल होणें हा भाग पूर्ण करून אָנָּא
בְּאָנָּא הַמְבָרֵךְ אֶת עַמּוֹ पासून יַעֲלֶה וְיָבֹא याचे
शेवटपर्यंत वाचावें.

אָנָּא בָּרְכֵנוּ בִּבְרָכָה भाग प. पृष्ठ.९८ हा भाग वाचिं-
तांना आहारोनाच्या कुळांतील जर कोणी कोहने ह्मणजे उपाध्या
असला, तर तो हेखालापुढें उभा राहून त्यांत लिहिलेला आशी-
र्वाद लोकांस देतो. परंतु तो आशीर्वाद देतेवेळीं त्याजकडून कांहीं
चूक न व्हावी ह्मणून हाज्जान त्यास एक एक शब्द सांगतो.
आणि हाज्जान प्रत्येक शब्द ह्मणत असतां मंडळी त्याच शब्दा-
च्या अर्थाचीं जीं वाक्यें ह्मणते तीं येणेंप्रमाणें.

יְבָרֶכְךָ आकाश व पृथ्वीचा उत्पन्न करणारा परमेश्वर सियो-
नेंतून तुला आशीर्वाद देईल.

„ हे परमेश्वरा आमच्या प्रभू, तुझें नाम सर्व पृथ्वींत
कितीमहान !

וְיִשְׁמְרֶךָ हे देवा, मला राख, कां तर म्यां तुजवर आशा
ठेविली आहे.

יָאֵר देवाने आह्मावर कृपा करावी; आणि आह्मास आ-
शीर्वाद द्यावा; आपलें मुख आह्मावर प्रकाशित
करावें. सेलाह.

„ परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी
आणि फार दयेचा व सत्यतेचा.

פָּנָיו तूं मजकडे फीर आणि मजवर दया कर; कारण
मी एकला व दुःखित आहें.

אֵלֶיךָ हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुजकडे लावितों.

וִיחֻנֶּךָּ पाहा, जसी चाकराची दृष्टि आपल्या धन्याच्या

हाताकडे, जसी चाकरिणीची दृष्टि आपल्या ध-
निणीचे हाताकडे असती, तसी आमची दृष्टि
आमचा देव परमेश्वर आह्मांवर कृपा करी तोंपर्यंत
त्याकडे आहे.

ישא तो परमेश्वरापासून आशीर्वाद आणि आपल्या तार-
णाच्या देवापासून नीतिमत्व पावेल. तूं देवाच्या व
मनुष्याच्या दृष्टींत प्रसाद व कुशल पावसील.

" हे परमेश्वरा, आह्मावर कृपा कर, आह्मी तुझी वाट
पाहिली आहे. प्रत्येक सकाळीं तूं त्यांचा बाहु हो,
संकटसमयीं आमचें तारणहि हो.

פניו माझ्या संकटाच्या दिवशीं तूं आपलें तोंड मजपासून
लपवूं नको; आपला कान मजकडे लाव.

אליך जो आकाशांत राहतो, त्या तुजकडे मी आपली
दृष्टि वर लावितों.

וישם आणि त्यांनीं माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर
लावावें, ह्मणजे मी त्यांस अशीर्वाद देईन.

לך हे परमेश्वरा, मोठेपणा व पराक्रम व तेज व जय व
मान हीं तुझीं; कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत
तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला
मुख्य अधिकार तुझा आहे.

שלום जो दूर आणि जो जवळ त्याला समाधान समाधा-
नच होईल, असें परमेश्वर ह्मणतो, आणि मी त्याला
आरोग्य करीन.

קדיש לעילא

ישראל עבדיך तुझे सेवक इस्राएल तुजपुढें एकत्र झाले
आहेत, ते तुझ्या क्षमेची इच्छा धरून तुझ्या तारणाची आवड
धरितात. हे देवा, हजारांशीं दया राखणाऱ्या! मी विनंती करि-
तों कीं, त्यांचे ओरडणें अधिक अर्पणाप्रमाणें तूं मान्य कर.

האל הנוצר חסד हे देवा, हजारांशीं दया राखणाऱ्या ! (तूं मान्य कर.)

तुझे सेवक इस्राएल, जे नीच पदास पावले आहेत, ते सामर्थ्यानें गौरवयुक्त देवापुढें नमन करीत व लोटांगण घालीत येतात; मी विनंती करतों कीं, त्यांचें ओरडणें सुगंधित अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल तुझाच आश्रय धरितात, तुझ्या दयेची वाट पाहून तुझ्या तारणाची आशा धरितात; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें होमाप्रमाणें व पेय अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल चकित झाले आहेत व घाबरले आहेत, त्यांच्या अगणित पापांमुळें त्यांस भय व त्रास प्राप्त झाला आहे; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें अर्पणाप्रमाणें व शांतिकारक यज्ञाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल कण्हत व ओरडत आहेत, आणि जरी त्यांजपाशीं सत्कर्में नाहींत तरी ते तुझ्या दयेचा आश्रय धरितात; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें पोळी व पापडी* यांचे अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.

אלהי הצבאות हे करूबांवर बसणाऱ्या परमेश्वरा, सैन्याच्या देवा, तूं आपल्या लोकांस वचन केलें आहेस कीं, अहो मागें फिरणाऱ्या लेंकरानों, फिरा; मजकडे मधुर गोष्टी करीत या; मला शोधा; म्हणजे तुम्ही पुष्कळ दिवस जगाल. तुझीं वचनें सर्वकाळ स्थापित नाहींत कीं काय ? त्यांवरच भरंवसा ठेवून आम्ही तुजकडे येतों. तूं चांगल्या जीवनांत आमची आठवण कर, तुझ्या फार दयेपैकीं आम्हांवर दया कर. तूं चांगल्यांसीं व वाईटांसींही चांगला आहेस; व पश्चात्ताप करणाऱ्यांस अंगिकारण्यासाठीं तुझा

* निर्गम २९. २३

उजवा हात लांबविलेला आहे. तूं अपराध्यांच्या मरणाची आवड धरीत नाहींस; ह्मणून आह्मी (तुजकडे) सकाळीं व संध्याकाळीं (येतों.) हे करूबांच्या सैन्यांत स्तुति पावलेल्या राजा, तूं आह्मास आमच्या पापांपासून व दोषांपासून शुद्ध कर; आमचीं अपार वाढलेलीं उल्लंघनें तूं क्षमा कर. कोरलेले खडकांकरितां (ज्या पूर्वजांपासून आह्मी कोरले गेलों अथवा उपजलों आहों,) त्यांकरितां तूं आह्मास उत्तर दे; पश्चात्तापाचीं द्वारें बंद होऊं देऊं नको; परंतु आमचें ओरडणें तुजकडे येऊं दे. हे ज्वाला फाडणाऱ्या, तूं आह्मास आपणाजवळ घे, गुरें व मेंढरें अर्पिल्याप्रमाणें तूं आह्मास प्रसन्न हो. आह्मी आबालवृद्ध तुझ्या पुष्कळ दयेवर भरंवसा व विश्वास धरून तुजकडे फिरतों; ह्मणून हे उंचांत वास करणाऱ्या खडकरूप आश्रया आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आह्मावर दया कर.

यानंतर संध्याकाळच्या प्रार्थनेंत पृष्ठ ३७ एथें लिहिलेलें אל מלך पासून पृष्ठ ४९ एथें लिहिलेले אלהינו שבשמים पर्यंत वाचावें; परंतु עשה למען आणि עננו אלהי אברהם या प्रत्येक भागानंतर אל מלך बोलावें आणि עננו אברהם यामागून אל מלך बोलण्यापूर्वी हें बोलावें.

שועה שעה गरीबाची विनंती व त्यांचीं वचनें मान्य करून पूर्वींच्या दिवसांप्रमाणें त्यांस उत्तर दे. हे महान व थोर (ईश्वर,) तूं आपल्या नांवाकरितां त्यांचीं सर्व पापें क्षमा कर. त्यांचीं सर्व उल्लंघनें व अपराध पुसून टाक, आणि हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, जर त्यांकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां त्यांविषयीं दयाभरित हो.

शेवटल्या אל מלך पूर्वी हें पुढील लिहिलें आहे, परंतु कोणी तें बोलत नाहींत.

אל מי कोणत्या रक्ताच्या सूड घेणाऱ्याकडे मी ओरडूं!

(कारण पाहावें तर) माझ्याच हातानें माझा रक्तपात केला. द्वेषणाऱ्यांचींहि मनें मी पारखिलीं, परंतु माझ्याच मनासारिखा माझा द्वेषी कोणी नाहीं. शत्रूचे फटके व घाय (मजबर) वाढले, परंतु माझ्याच हातासारिखा मजबर फटके मारणारा व घाय करणारा कोणी नाहीं. नाश करणारांनी मला व्यर्थतेच्या पुढें केलें; परंतु माझ्याच डोळ्यासारिखा मला फुसलावणारा व पुढें करणारा कोणी नाहीं. अग्नीच्या प्रवाहांचे प्रवाह मी पार केले, परंतु माझ्याच वांच्छेच्या उष्णतेप्रमाणें मला कोणीच जाळिलें नाहीं. मी जाळ्यांत व फासांत पडलों, परंतु माझ्याच जिभेसारिखें मला कोणी फासांत पाडिलें नाहीं. सर्पाच्या व विंचूच्या दंशाच्या वेधना मला लागल्या, परंतु माझ्याच दातांसारिखा माझ्या मासांत कोणी दंश केला नाहीं. सरदारांनी हलक्या गोष्टींवरून माझा पाठलाग केला, परंतु माझ्याच पायांप्रमाणें माझ्या पाठीस कोणी लागलें नाहीं. माझीं दुःखें मजबर वाढलीं, परंतु माझ्या क्लेशासारिखें कोणतें दुःख नाहीं. माझे मनोविकार फार झाले; परंतु त्या सर्वांपेक्षां माझे अपराध फारच वाढले. मी कोणाकडे आणि कशाविषयीं ओरडूं ! माझे नाश करणारे मजपासूनच निघाले आहेत. तुझ्या दयेच्या आश्रयाखालीं आल्यावांचून मला कोठेंच चांगलें सांपडत नाहीं; यास्तव हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, चकित झालेल्यांच्या मनावर तुझी विशेष दया होऊं दे.

אל מלך

या प्रार्थनेंत אל מלך सात वेळ ह्मटला जातो; त्या प्रत्येकामागून या पुढील सात वाक्यांतून एक एक वाक्य ह्मणतात.

אנא בכח (हे परमेश्वरा !) मी विनंती करितों कीं, तूं आपल्या उजव्या हाताच्या महत्वाच्या सामर्थ्यानें बंदिवानांस मोकळें कर.

हे गडरूप आश्रया ! तूं आपल्या लोकांचें स्तवन मान्य कर; हे भयंकरा, आह्मास शुद्ध कर.

हे बळवंता ! तुझ्या एकत्वाचा शोध करणारांस आतां डोळ्यां-

च्या पुतळीप्रमाणें सांभाळ.

त्यांस आशीर्वाद देऊन शुद्ध कर; आणि नेहमी आपल्या यथार्थतेच्या दयेनें त्यांची फेड कर.

हे पराक्रमी व पवित्र (देवा,) आपल्या पुष्कळ चांगुलपणाकडून आपल्या समुदायास चालीव.

हे स्वतांच महत्ववान असणाऱ्या, तुझ्या पवित्रतेचें आठवण करणाऱ्या लोकांस अनुकूळ हो.

हे गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, आमची विनंति मान्य कर, आणि आमचें ओरडणें ऐक.

אין כאלהינו आमच्या देवासारिखा कोणी नाहीं; आमच्या प्रभूसारिखा कोणी नाहीं; आमच्या राजासारिखा कोणी नाहीं; आमच्या तारणाऱ्यासारिखा कोणी नाहीं. आमच्या देवासारिखा कोण! आमच्या प्रभूसारिखा कोण! आमच्या राजासारिखा कोण! आमच्या तारणाऱ्यासारिखा कोण! आह्मी आपल्या देवाला स्तवूं! आह्मी आपल्या प्रभूला स्तवूं! आह्मी आपल्या राजाला स्तवूं! आह्मी आपल्या तारणाऱ्याला स्तवूं! आमचा देव धन्य; आमचा प्रभु धन्य; आमचा राजा धन्य; आमचा तारणारा धन्य. तूंच आमचा देव; तूंच आमचा प्रभु; तूंच आमचा राजा; तूंच आमचा तारणारा! तूंच आमचें तारण करिशील, तूं उठून सियोनेवर दया करिशील, कारण तिजवर कृपा करण्याचा नेमिलेला वेळ आला आहे.

קדיש תתקבל भा. प. पृष्ठ. ५८.

תנא דבי אליהו येलियाहूच्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें मत असें आहे कीं, जे कोणी प्रतिदिवशीं विधींचें मनन करितात, ते सर्व पुढील जगाचे पुत्र * होतात, असी आशा आहे. जसें ह्मटलें आहे कीं, त्याचे मार्ग सर्वकाळचे आहेत. हें वाक्य वाचितांना "मार्ग" असें वाचूं नको, परंतु "विधि" असें वाच.

אמר רבי אלעזר रिब्बी एलआजार व रिब्बी हानीना ह्मणतात कीं, ज्ञानी विद्यार्थी जगांत शांति वाढवितात; जसें ह्मटलें आहे

* पुढील जगाचें वतन पावणारे.

कीं, आणि तुझीं सर्व लेंकरें परमेश्वराने शिकविलेलीं होतील, आणि तुझ्या लेंकरांचें अत्यंत कुशल होईल. तें वाक्य "तुझीं लेंकरें" असें वाचूं नको, परंतु "तुझे बांधणारे" असें वाच; तुझ्या कोटामध्यें कल्याण, तुझ्या राजवाड्यांत सुख होईल. मी आपल्या भावासाठीं व आपल्या मित्रासाठीं बोलेन, "तुझ्यामध्यें कल्याणच असो. आमचा देव परमेश्वर याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन. आपल्या लेंकरांच्या लेंकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहसील. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितील, त्यांचें फार कल्याण आहे, त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त अशीर्वाद देतो."

כל ישראל सर्व इस्राएलांस पुढील जगांत विभाग आहे, जसें म्हटलें आहे कीं, तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि म्या गौरवलेलें व्हावें म्हणून, जसें माझ्या हाताचें कर्म तसें ते सर्वकाळपर्यंत भूमीचें वतन भोगितील. रिब्बी यहुदा असें म्हणतो कीं, जो कोणी शास्त्राचा अभ्यास करण्याकरितां श्रम करितो, आणि तेणेंकरून आपल्या उत्पन्न कर्त्याचा आत्मा संतुष्ट करितो, तो कीर्ति मिळवितो, आणि या जगांतून कीर्तिनेंच जातो. याजविषयीं शेलोमो आपल्या बुद्धीनें असें म्हणाला आहे, कीं कीर्ति उत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या जन्मदिवसापेक्षां, त्याचा मरणदिवस चांगला आहे. शास्त्र पुष्कळ शिक; म्हणजे तुला त्याचें वेतन पुष्कळ मिळेल. परंतु असें जाण कीं, पुण्यवंतांस वेतन पुढील जगांत मिळतें.

רבי חנניה आकशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें म्हणतो कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें म्हणून शास्त्र व आज्ञा वाढवाव्या अशी ईश्वरी इच्छा झाली. जसें म्हटलें आहे कीं, त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचा-

विलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु ह्मणा.

על ישראל जे इस्राएल, आमचे गुरु, त्यांचे शिष्य व त्यांच्या शिष्यांचे शिष्य या गावीं व गांवोगावीं पवित्र शास्त्राचा अभ्यास करितात, त्यांजवर व आह्मांवर आकाश व पृथ्वीच्या स्वामीपुढून दया, कृपा व अनुग्रह होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकास पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत.) आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עלינו לשבח भा. प. पृष्ठ. ६१.
על כן נקוה לך भा. प. पृष्ठ. ६२.

מנחה

प्रार्थनारूप नैवेद्य.

למנצח על הנתית गीत ८४

" וידבר " आणि परमेश्वराने मोशाला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलांच्या संतानास आज्ञा देऊन सांग कीं, माझीं अर्पणें, माझीं अन्नदानें हीं शांतिकारक सुवासासाठीं माझ्याजवळ यथाका-

ळीं करावयास तुह्मी सांभाळा. आणि तूं त्यांस सांग कीं, तुह्मी जे होमपशु नेहमी प्रतिदिवशीं परमेश्वराला अर्पावे, ते असे; पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे, एक मेंढा सकाळीं तूं अर्पण कर, आणि एक मेंढा संध्याकाळीं अर्पण कर, आणि नैवेद्यासाठीं एकाचा एक दशमांश सपीठ, पावहीन * कुटून काढलेलें तेल यांत मळलेलें व्हावें. हा नित्य सिनाय डोंगरावर नेमलेला, परमेश्वराजवळ शांतिकार सुवासासाठीं अर्पण असा आहे. आणि त्याच्या संगतीं जें पेय अर्पण करावयाचें, तें एका मेंढ्यासंगतीं पावहीन द्राक्षरस; तें तूं पवित्र स्थानांत परमेश्वराजवळ ओतून पेय अर्पण कर. जसा सकाळचा नैवेद्य आणि त्याचें पेय तसें अर्पण कर; हें अर्पण परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास आहे.

एथें פטום הקטורת सुगंधाचा प्रकार बोलण्याची चाल आहे.

אשרי יושבי בתיך जे तुझ्या घरांत राहतात ते, धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील, सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

ובא לציון גואל आणि उद्धारणारा सियोनेस येईल, व याकोबांत जे अपराधापासून फिरतात, त्यांजकडे येईल असें परमेश्वर ह्मणतो. आणि परमेश्वर ह्मणतो, त्यांसीं माझा करार हाच आहे, जो माझा आत्मा तुझ्याठायीं आहे, व जे माझे शब्द म्या तुझ्या मुखांत घातले आहेत, ते तुझ्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या संतानाच्या मुखांतून, आतांपासून सर्वकाळपर्यंत सरणार नाहींत, असें परमेश्वर ह्मणतो. तथापि तूं पवित्र इस्राएलांच्या स्तवनांमध्यें राहतोस आणि ते (दूत) एकमेकाला मोठ्यानें बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे. आणि त्यांनी एक प्रत्येकाचा शब्द मान्य करून ह्मणाले, उंच आकाश जें

* हीन हें एक माप आहे.

त्याच्या साक्षातकाराचें प्रतिष्ठित वसतिस्थान तेथें पवित्र; त्याच्या पराक्रमाचें कृत्य जी पृथ्वी, तिजमध्यें पवित्र; तो सदांसर्वकाळ पवित्र आहे; तो सैन्याचा देव आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाच्या वैभवाने भरली आहे. * तेव्हां आत्म्याने मला उंचावलें आणि म्या आपल्या पाठीमागून मोठा गोंगाटाचा शब्द ऐकिला, तो असा कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. तेव्हां आत्म्याने मला उचललें आणि मी आपल्या मागें स्तुति करणारांचा मोठा सुसाट्याचा आवाज बोलतां ऐकिला कीं, ईश्वराचें गौरव त्याच्या महत्वाच्या मंदिराच्या स्थानांतून सुवंदित असो. * परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. परमेश्वराचें राज्य सर्वकाळ स्थापित आहे * हे परमेश्वरा, आमच्या वडिलांच्या, आब्राहामाच्या, इसहाकाच्या व इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या लोकांच्या अंतःकरणाच्या कल्पनांतल्या विचारांत असें सर्वकाळ राख आणि त्यांचें अंतःकरण आपल्यासाठीं स्थिर कर. तथापि तो, ममताळु होता; यास्तव त्याने अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्याने बहुत वेळ आपला राग टाकिला, आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. कां तर, हे प्रभु, तूं चांगला व क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तुझी नीति सर्वकाळ नीतिच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे. तूं याकोबासाठीं खरेंपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहिलीस ती प्रभुची स्तुति असो, दिवसोदिवस तो आह्मास उपकार लादून देतो, तो आमचा तारणाराचा देव आहे. सेलाह. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगतीं आहे; याकोबाचा देव आह्मास आश्रय आहे. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो, तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हाक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

* हीं तीन वाक्यें योनाथान बेन उझ्जीएल याने यशाया. ६. ३ येहेजकेल ३. १२ आणि निर्गम. १५. १८ या वाक्यांवर केलेलें तारगुम भाषेतलि भाषांतर आहे.

ברוך אלהינו हे आमच्या देवा, ज्याने आह्मास आपल्या महत्वाकरितां उत्पन्न करून आह्मास अनिष्टांपासून निराळें केलें, आणि आह्मास सत्यशास्त्र देऊन आह्मामध्यें सर्वकाळच्या जिवनाची लागवड केली; तूं धन्य आहेस. तोच आपल्या शास्त्राकडे आमचीं मनें उघडील (लावील;) आणि आह्मी त्याची इच्छा पूर्ण करून त्याची सेवा पूर्ण मनाने करावी परंतु व्यर्थ कष्ट करूं नयेत व गोंधळ उत्पन्न करूं नये; ह्मणून तोच आमच्या मनांत आपली प्रीति व आपलें भय घालील. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी या जगीं तुझे नेम पाळून पुढील जगाच्या आयुष्यासाठीं पुण्याई करून त्यांतील जीवनास व वतनास योग्य व्हावें असी तुझी प्रसन्नता होवो. यासाठीं कीं, माझ्या गौरवाने तुझें कीर्तन करावें. आणि उगेंच राहूं नये; हे परमेश्वरा माझ्या देवा, मी सर्वकाळ तुझी स्तुति करीत जाईन. त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. आणि जे तुझें नाम जाणतात ते तुजवर आशा ठेवितील; कारण कीं हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस. हे परमेश्वरा, आमच्या प्रभू, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान ? अहो परमेश्वराचे वाट पाहणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें हृदय सबळ करील.

קדיש לעלא

शास्त्र काढल्यापूर्वीं हें बोलतात.

אל ארך אפים हे सहनशील आणि मोठ्या दयेच्या व सत्यतेच्या देवा, तूं आपल्या रागाने आह्मास धमकावूं नको; तूं आपले लोक इस्राएल यांजवर कृपा कर आणि आह्मास सर्व वाईटापासून तार; आह्मी तर तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभू देवा, आह्मी विनंती करितों कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें आह्मास क्षमा कर.

אל ארך אפים हे सहनशील देवा आणि दयासागरा, तूं आह्मापासून आपलें तोंड लपवूं नको; तूं आपले लोक इस्रा-

एल यांच्या शेषावर कृपा कर आणि आह्मास सर्व वाईटापासून सोडी-व. आह्मी तर तुजविरुद्ध पाप केलें आहे. हे प्रभु देवा, आम्ही विनंती करितों कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें आम्हास क्षमा कर.

शास्त्र काढितांना भा. प. पृ. १०३ एथें लिहिल्याप्रमाणें बो-लतात. नंतर शास्त्र काढून त्यांतील लेवी पुस्तकाचा १८ वा अध्याय वाचायास तीन मनुष्यें बोलवितात. त्यानंतर קדיש לעילא बोलून हाफातारा योनाचे पुस्तकांत पहिल्यापासून शेवट-पर्यंत वाचतात. आणि पाहांटेच्या प्रार्थनेंत हाफताऱ्या पूर्वी व मागें जो धन्य वाद आहे तोच वाचितात.

यानंतर शास्त्र ठेवायास नेतांवेळीं भा. प. पृ. ११० एथें लिहि-ल्याप्रमाणें बोलतात.

शास्त्र ठेविल्यानंतर קדיש לעילא बोलून हळू व एकचि-त्तानें वाचायाचा אדני שפתי संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्या-प्रमाणें वाचावा. पुनः मोठ्याने वाचितांना जसें पाहांटेच्या प्रार्थनेंत त्याप्रमाणें वाचावें, परंतु त्यांतील ईश्वरी पवित्रतेच्या वर्णनामध्यें व पापा-विषयीं कबूल होण्यामध्यें मात्र भेद आहे तो येणेंप्रमाणें.

ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך מלך आणि हे राजा, याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानितों. दो. वे.

בני עליון परात्पराचे पुत्र * उंच आकाशांत आणि शुद्ध लोक ज्योति उगवितांना अनंताला पवित्र मानायास त्वरा करून जातात; आणि चकित मनाने व मोठ्याने गायन करून इस्राएलाच्या देवा-ला थोर मानितात.

परात्पराचे पुत्र ज्यांचा बांधा चमत्कारिक व शरीर चंद्रासारिखें आहे; त्यांस पन्नग, विचित्रक आणि नील यांचें तेज दिल्हें आहे; ते टांकीच्या किंवा नदीच्या पाण्याने नव्हे परंतु अग्नीने स्नान करितात, तर त्याच्या प्रकाशाची तुळणा व बरोबरी कोणत्या प्रका-शासीं होईल; कारण स्त्रीपासून जन्मलेल्या मनुष्याच्या तत्वासारखें

† दूत.

त्यांचें तत्व नाहीं; त्यांचें तत्व पारदर्शक आकाशासारिखें आहे.

प्रिय आणि थोर पूर्वजांपासून * निघालेले शुद्ध लोक आपल्या धोक्याच्या घरांतही † शुद्धपणें वास करितात; निर्दोष मनानें व स्वच्छ शरीरानें देव दुतांसारिखे व्हवयास त्वरा करून (त्याकडे) धांवत जातात, आणि निरनिराळ्या प्रदेशांत प्रार्थना करण्यास पाहांटेस उठतात; आणि आगस्त्य नक्षत्रांसारख्या तेजस्वी आत्म्यानें आपलीं वस्त्रें धुवून शुद्ध होतात.

परात्पराचे पुत्र, ज्यांचें स्वरूप मनुष्यासारिखें नसून लावण्य आहे, आणि ज्यांची प्रतिमा संतांच्या मनांतील विचारांसमोरच असते, त्यांचा आकार चमकत्या उजेडासारिखा आणि अग्नीच्या ज्वालेसारिखा आहे; आणि विजेच्या बाणासारिखीं वस्त्रें पांघरितात; ते भूक व तहान व दुसऱ्या सर्व मानवी कामनांपासून मोकळे आहेत; पाय व मांडी यांनी पाऊल टाकल्यावांचून ते तुजकडे धांव घेतात आणि आपआपल्या ठिकाणीं तुला पवित्र गायन गातात कारण ते अति पवित्र आहेत.

आणि, शुद्ध लोक निर्मल शरीरानें तुझ्या मंदिराच्या पवित्र ठिकाणीं एकत्र होण्यास धांव घेत येऊन, तुजपुढें जी नवी स्तुति ते करितात ती तुला अति पवित्र अर्पणासारिखी मान्य व्हावी; ह्मणून ते उत्कंठतेनें तुझी प्रसन्नता मागतात; आणि मनुष्याच्या वांच्छेपासून दूर राहून मोशेनें दिल्हेला नियम ज्यांत "तुह्मी पवित्र व्हावें ह्मणून तुम्ही शुद्ध व्हा" असें लिहिलें आहे त्याप्रमाणें ते आज आपणास शुद्ध करितात.

परात्पराचे पुत्र, जेथें रात्र नाहीं व वेळ मोजला जात नाहीं, तेथें ईश्वराचें स्तवन करायास व त्याच्या आश्चर्य कृत्यांविषयीं गावयास, त्यास थोर मानायास व उत्सुकतेनें त्याचें भजन करायास धांवतात; आणि शुद्ध लोक तुझी भयंकर स्तुति करायास नेमिलेल्या मंडळींमध्यें उभे राहून प्रार्थना करितात; आणि ज्यास

---

* ई. उगमापासून.

† प्रवासांतहि.

स्तवन शोभतें त्यासच मात्र "पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर" असें गौरवून गायन करितात.

रिब्बी इसहाक बेन इस्राएल यानें रचिलेलें ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वाणीली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אנשי חסד यथार्थ मनुष्यें आपली वाणी उंचावून परमेश्वराला गौरवितात. ते सर्व एकदाच स्तुति करून असें म्हणतात कीं, गौरवामध्यें एवढी तुझी बरोबरी कोण करील ? त्याचा हात त्यांच्या समुदायांवर गौरवेंकरून लोहस्तंभासारिखा आणि त्यांभोंवतें अग्नीच्या कोटासारिखा आहे. त्यांचा पापरूप विकार तो बरा करो, आणि त्यांच्या कर्मास तो प्रसन्न होवो, आणि भक्त गौरव करून उल्हास करोत. इशायाचें मूळ* त्या लोकांकरितां सर्वकाळ ध्वजासारिखा उभा असो, परमेश्वराचा कोंब* सुंदर व गौरवी होवो. मग ते लोक असें म्हणतील कीं, त्यांच्या कष्टांच्या वेतनाकरितां हें सर्व गौरव त्यांस प्राप्त झालें आहे. त्यांची वाणी (प्रार्थना) तो मान्य करून संपत्ति, महत्व आणि धारिष्ट त्यांस वतनरूप करून देवो. त्यांचा निर्माता त्यांच्या मुखदर्शनास प्रसन्न झाला आहे, असें त्याच्या चांगुलपणाकडून शुभवर्तमान कळून येवो, मग त्याच्या पुरातन लोकांपुढें गौरव होईल. त्याचें आसन वाहणारे म्हणतील कीं, अहो ! सर्वकाळचे दरवाजे हो! तुम्ही उंच व्हा; कारण गौरवी राजा आंत येत आहे. त्या गौरवी राजापूर्वीं कोणी उत्पन्न करणारा देव नव्हता, त्या देवानें आपल्या लोकांकरितां आपलें पवित्र वचन पाठविलें आहे. त्यांनीं देवदुताप्रमाणें त्यास थोर मानावा, आणि त्यांनीं याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानावें, असें त्यांस सांगितलें आहे.

पापाविषयीं कबूल होणें.

רבונו של עולם हे जगदीशा, प्रार्थनारूप नैवेद्य करायाचे वेळेस असें होतें कीं, जेव्हां मी आपलीं पापें, उल्लंघनें, आणि

* यशाया अ. ११ श्रो. १ एथें हीं नावें मशीयाहास दिल्हीं आहेत.

ऋणें मनीं आणितों; तेव्हां मला भय आणि कंप सुटतो. देव जेव्हां न्याय करायास उठतो, तेव्हां मी चकित होऊन बसतों, माझे विचार विस्मित होतात, आणि माझ्या कल्पना गर्जू व भिऊं लागतात. जेव्हां तो न्यायासनावर बसेल, तेव्हां त्यास कोण भिणार नाहीं ! जेव्हां तो न्याय करायास जवळ येईल, तेव्हां मी त्यास काय उत्तर देऊं ! देव उठेल तेव्हां मी काय करूं ! आणि तो झडती घेऊं लागला ह्मणजे मी त्याला काय उत्तर करूं ! जसा मुका आपलें तोंड उघडीत नाहीं तसा मी झालों; माझ्या फार अपराधांमुळें भी भ्यालों; मला लज्जा प्राप्त झाली आणि मी घाबरलों. परंतु असी जी लज्जा तिला हाय हाय ! आणि असें जें घाबरणें त्याला हाय हाय ! वर (आकाशांत) राहणाऱ्या (देवास) भूमीवरील माती काय उत्तर देईल ? जर मी यथार्थ होऊं पाहतों, तर माझेंच तोंड मला दोषी ठरवितें; आणि जर माझे अपराध मला चिकटून राहतात, तर मी काय बोलूं ? व आपणास यथार्थ कसें मानूं ? मी आपणाकरितां एकादा चांगला मध्यस्थ इच्छितों, आणि आपले मनीं त्याची आवड धरितों; परंतु शोधाअंतीं तो सांपडत नाहीं. ईश्वर कदाचित मला अंगीकारील ह्मणून, त्यापुढें अर्ज करायास म्यां आपल्या मस्तकास, कपाळास आणि तोंडास बोलाविलें. तेव्हां मस्तकानें उत्तर केलें कीं, मस्तक कसें उंच होईल? त्यास तर हलक्या मस्कऱ्या करण्याची* सवय आहे; आणि सर्वांवरील जो अधिकारी त्यास अनुसरण्यापासून फिरण्यासाठीं, तें असें ह्मणालें आहे कीं, या, आपण आपणासाठीं पुढारी करूं. तोंड जें त्यासमोर घाबरूनच गेलें, त्यानें उत्तर केलें कीं, हें त्याच्या धन्यास कसें मान्य होईल ? त्यापुढें दुष्ट मनुष्यास धैर्य आहे काय ! माझ्या कपाळानें मला प्रत्युत्तर केलें कीं, स्त्रीपासून जन्मलेला शुद्ध कसा होईल ? तुझीं पापें हृदयाच्या पाटीवर कोरलेलीं आहेत, आणि तुझें कपाळ निर्लज्ज † आहे. मग मी आपले मुखास, ओंठांस आणि जिभेस आकाशांत वस्ति करणारा खडकरूप आश्रय जो परमेश्वर, तो कदा-

* इ. मस्तक हलकें करण्याची. † इ. तांब्याचें.

चित माझे दु:खांत मजकडे पाहील, म्हणून त्याची प्रार्थना करायास मी त्यांस सांगितलें. तेव्हां माझ्या मुखानें मला उत्तर केलें कीं, अशुद्ध भाषणें करणाऱ्या मुखास आभाळांत राहणाऱ्यासमोर एकादा शब्द काढण्याची तरी आशा आहे काय ? ओंठांनीं अडखळत जाब केला कीं, यथार्थ बोलणाऱ्यापुढें फुसलावणारे ओंठ कसे बोलूं शकतील? आणि जिभेनें मला प्रत्युत्तर केलें कीं, स्तुतीने भयंकर जो देव, त्यासमोर प्रार्थना करायास गलिच्छ गोष्टी करणारी जीभ कशी मान्य होईल ? मग माझें गौरव व माझें मस्तक उंच करणाऱ्या (प्रभु) समोर प्रार्थना व काकुळती करायास मी आपले हृदयास व जीवास सांगितलें. तेव्हां माझ्या हृदयानें उत्तर केलें कीं, चिखलांत गढलेलें, आणि झोपेंतही अपराधाविषयीं विचार करणारें मन कसें प्रार्थना करूं शकेल ? आणि दुष्ट संकल्प योजणारें हृदय एकचित्तानें कसें काकुळती करूं शकेल? आणि माझ्या जीवानें जाब दिल्हा कीं, ज्या जीवानें अपराध केले, तो उंचनीचावरील पदार्थांस उत्पन्न करणाऱ्यापुढें कशी विनंती करील ? मग मी आपले हातांस (देवापुढें) पसरलें जाण्यास विचारलें; त्यांनीं उत्तर केलें कीं, हात शुद्ध असल्यावांचून ते आकाशाकडे कसे पसरले जातील ? नंतर ईश्वराचे घरीं शोक करायास जाण्यासाठीं मी आपले पायांस विनंती केली; तेव्हां त्यानीं मला उत्तर केलें कीं, दुष्कर्माकडे त्वरित धावणारे पाय, जो दुष्टाईची आवड धरीत नाहीं, त्याचे घरीं कसे जातील ? मला हाय हाय ! म्या कल्पिलें होतें कीं माझे अवयव मला धैर्य देतील; परंतु पापामुळें ते अडखळतात, ह्मणून मला लज्जा प्राप्त होते. म्या आपले प्रियास बोलाविलें, परंतु त्यानें मला फसविलें; तेव्हां प्रभूच्या प्रभूसमोर मजकरितां विनंती व काकळूत करितील, ह्मणून मी वरल्या व खालच्या पदार्थांस बोलाविलें. मी ओरडलों, तरी मला कोणी आधार देणारा किंवा सहाय्यकारी सांपडला नाहीं; मी शोक केला, तरी कोणी धैर्य देणारा नाहीं व आश्रय देणाराहि पाहिला नाहीं. कोणी सहाय्य करणारा नाहीं असें म्या

पाहिलें, आणि कोणी उद्धारणारा नाहीं ह्मणून मला आश्चर्य वाटलें. तेव्हां मी आपल्या मनीं विचार केला कीं जर मीच आपणासाठीं नाहीं, तर मजसाठीं कोण? तर आतां, प्रभु परमेश्वर माझें सहाय्य करील, ह्मणून मी आपलीं उलंघनें व दुष्कर्में यांविषयीं कबूल होतों. माझे प्रत्येक अवयव स्वतःच्या अपराधामुळें भिऊन चकित होतात; आणि आपल्या पापांविषयीं दुःखभरित वाणीने कबूल होऊन एक प्रत्येकास हाक मारून ह्मणतात.

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना यांतील जे भाग वाचावयाचे त्यांपूर्वी हें बोलावें.

יה שמע אביוניך हे अनंता, तुझ्या मुखदर्शनाची वाट पाहणाऱ्या दरिद्र्यांचें ऐक; हे आमच्या बापा! तूं आपले लेंकरांपासून आपला कान लपवूं नको.

יה עם ממעמקים हे अनंता! जे लोक अत्यंत दुःखामुळें खोल स्थानांतून ओरडतात, त्यांस आज तूं आपणापुढून रिकामें परतवूं नको.

הוותם ועונם त्यांची दुष्टाई, त्यांचीं पापें आणि त्यांचा अतिशय गर्व तूं पुसून टाक; आणि हे माझ्या खडकरूप आश्रया! जर तूं त्यांकरितां तसें करीत नाहींस, तर तूं आपणाकरितां तसें कर.

ומחה היום חובם त्यांचीं ऋणें आज पुसून टाक, आणि त्यांच्या (तोंडच्या) वचनास (तुजपुढें आणलेल्या) भेटीप्रमाणें प्रसन्न हो; त्यांचीं मनें तूं आपणाकडे वळीव आणि (त्यांकडे) आपला कानहि लाव.

דמעת פניהם תשעה त्यांच्या तोंडावरील अश्रुं तूं पुस; आणि बहकलेलीं मेंढरें एकवट करून तूं आपणाकरितां मेंढपाळ * उठीव; आणि चांगुलपणाने आपल्या शेरडांस दर्शन दे.

הולכי בדרך נכוחה सरळ मार्गाने चालणारांस तूं क्षमेचें शुभवर्तमान ऐकीव; आणि ही नैवेद्यरूपी प्रार्थना करितांना त्यांस तुझी कृपा सांपडूं दे.

* मशीयाह.

एथें पा. क्ष. प्रा. यांतील जो भाग वाचायाचा तो संध्याकाळच्या प्रार्थनेंत जसा आहे, त्याचप्रमाणें आहे; परंतु לקדושת שמך यापूर्वी एक वेळ אל מלך अधिक आहे. आणि शेवटच्या אל מלך बोलण्याबद्दल कोणी हें बोलतात.

אל ארך אפים तूं मंदक्रोधी देव आणि दयेचा स्वामी आहेस; तूं आपल्या दयेचा व कृपेचा मोठेपणा, पूर्वीं नम्र (जो मोशे) यास कळविलास; आणि तुझ्या शास्त्रांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, तेव्हां परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला आणि त्यानें परमेश्वराचें नाम मोठ्यानें सांगितलें.

"ויעבור"

סלח לנו אבינו हे आमच्या बापा, आह्मी पाप केलें आहे; ह्मणून आह्मास क्षमा कर; हे आमच्या राजा, आह्मी उलंघनें केलीं, ह्मणून आह्मास माफ कर. कां तर हे प्रभु! तूं चांगला, क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तूं आपल्या प्रसन्नतेने सियोनेचें बरें कर; यरुशलेमेचीं गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोडाचे होम करितील.

קדיש תתקבל भा. प. पृष्ठ ५८.
עלינו לשבח भा. प. पृष्ठ ६१.
על כן נקוה לך भा. प. पृष्ठ ६२.

נעילה

दरबार वंद होण्याच्या वेळची प्रार्थना.

हें पुढील गीत सूर्य मावळल्याअगोदर बोलावें आणि तें तारे निघाल्याअगोदर पुरें झालें पाहिजे. कोणी कोणी हें गीत ह्या प्रार्थनेच्या आरंभीं न बोलतां, त्यामधील पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थनेपूर्वी वाचितात.

אל נורא עלילה हे भयंकर कृत्यें करणाऱ्या देवा! आम्हास या नेईलाचे वेळीं* क्षमा सांपडूं दे.

מתי מספר קרואים ज्यांस अल्प संख्येचे लोक असें नांव पडलें आहे; ते या नेईलाचे वेळीं दुःखानें पोळले असतांहि, आपले डोळे तुजकडे लावितात. אל

שופכים לך נפשם ते आपला जीव तुजपुढें ओतितात, ह्मणून तूं त्यांचीं उलंघनें व त्यांचे दगे पुसून टाक, आणि या नेईलाचे वेळीं त्यांस क्षमा सांपडूं दे. אל

היה להם לסתרה (तूं) त्यांस आश्रय होऊन श्रापापासून त्यांस सोडीव, आणि या नेईलाचे वेळीं त्यांस मोठेपणा व हर्ष प्राप्त व्हावा असी तूं मोहोर कर. אל

חון אותם ורחם त्यांजवर दया व कृपा कर; आणि जे कोणी त्यांवर जुलूम करून त्यांसीं लढतात, त्यांचा या नेईलाचे वेळीं तूं न्याय कर. אל

זכור צדקת אביהם त्यांच्या पूर्वजांच्या पुण्याची आठवण कर, आणि या नेईलाचे वेळीं, त्यांचे दिवस पूर्वींप्रमाणें नवे कर. אל

קרא נא שנת רצון मी विनंती करितों कीं, या नेईलाचे वेळीं तूं प्रसन्नतेचें वर्ष गाजीव, आणि आहोलीबा व आहोला † यांच्या उरलेले शेरडांस परतीव. אל

(מחה כעב פשעים तुझी संपत्ति असें ह्मटलेल्या लोकांचीं उलंघनें या नेईलाचे वेळीं ढगाप्रमाणें पुसून टाक, आणि त्यांजवर दया कर.)

תזכו לשנים רבות अहो बाप लेंकांनो! पुष्कळ वर्षें हर्षानें व आनंदानें वांचण्याची पुण्याई या नेईलाचे वेळीं तुमच्या अंगीं येवो. אל

מיכאל שר ישראל हे इस्राएलाच्या सरदारा, मीखाएला, हे येलीया व गाब्रीएला! या नेईलाचे वेळीं उद्धाराचें शुभवर्तमान तुह्मी गाजवा. אל

* दरवार बंद होण्याच्या वेळीं. † येरूशालेम व शोमरोन.

" יהי חסדך " हे परमेश्वरा ! जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आह्मांवर होवो. जे तुझ्या घरांत राहतात ते धन्य, ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

קדיש לעילא

यानंतर हळू व एकचित्ताने वाचायाचा אדני שפתי संध्याकाळच्या प्रार्थनेतल्यासारिखाच आहे, परंतु त्यांत जेथें "आह्मास लिहा" असे शब्द असतील, त्यांबद्दल "आह्मा-विषयीं मोहोर कर" असें वाचावें. आणि पृष्ठ २१ एथील. מה נאמר बद्दल हें पुढील बोलावें.

מה נאמר हे उंचस्थानीं राहाणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं! आणि हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं! तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस काय ?

מה אנו आम्ही काय ? आमचें जिणें काय ? आमचें यथार्थपण काय? आमचें सामर्थ्य काय ? आमचें बल काय ? आणि हे परमेश्वरा आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं ? पराक्रमी (मनुष्यें) तुजपुढें कांहींच नाहींत, नामांकित मनुष्यें जसीं नव्हतींच; ज्ञानी मनुष्यें जसीं बुद्धिहीन; आणि चतुर जसे विवेकहीन असे नाहींत कीं काय ? कारण आमचीं कर्में बहुतकरून शून्यच आहेत; आयुष्याचे दिवस तुजपुढें व्यर्थ आहेत. आणि मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ नाहीं; कारण सर्व व्यर्थता आहे.

אתה הבדלת त्वां मनुष्यास पूर्वीपासून निराळाच करून ठेविला आहे; आणि त्याने तुजपुढें उभें राहावें ह्मणून त्यावर तूं कृपा केलीस; कारण तूं काय करितोस असें तुला कोण ह्मणेल ? आणि जरी तो यथार्थ झाला; तरी तो तुला काय देऊं शकेल ? आणि आह्मास क्षमा, माफी आणि सुटका व्हावी, आणि आमचीं सर्व पापें क्षमा व्हावीं, आम्हीं आपले हात दग्यापासून आवरून धरून पूर्ण मनाने तुझ्या इच्छेचे नेम

पूर्ण करण्यास पश्चात्ताप करावा ह्मणून हा (शा. अ. शाब्बाथ दिवस व हा) प्रायश्चित्ताचा दिवस, हा पापाची क्षमा होण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस त्वां आह्मास दिल्हा आहे. तर तूं आपल्या अत्यंत दयेने आह्मावर दया कर; कारण जगाच्या नाशाची तुला आवड नाहीं. जसें ह्मटलें आहे कीं, " परमेश्वर सांपडेल त्या काळीं त्याला शोधा; तो जवळ असतां त्यास हाक मारा. दुष्ट आपल्या मार्गास व अन्यायी मनुष्य आपल्या संकल्पास सोडो, आणि परमेश्वराकडे फिरो ह्मणजे तो त्याजवर दया क-रील; आणि आमच्या देवाकडे फिरा, कां कीं, तो फार क्षमा करील." आणि तूं क्षमा करणारा, कृपाळू, दयाळू, मंदक्रोध, बहुप्रसाद आणि पुष्कळ चांगलें करणारा देव आहेस. दुष्टांनीं पश्चात्ताप क-रावा, असें तूं इच्छितोस; आणि त्यांच्या मरणाची तूं आवड धरी-त नाहींस. जसें ह्मटलें आहे कीं " प्रभु परमेश्वर ह्मणतो, त्यांस सां-गा कीं, मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं निश्चयें मी दुष्टा-च्या मरणाविषयीं संतोषत नाहीं. परंतु जर दुष्ट आपल्या मार्गा-पासून फिरला, आणि वांचला, तर संतोषतों; अहो इस्राएलाच्या वंशानों, तुह्मी फिरा, आपल्या कुमार्गापासून फिरा, तुह्मी कां मर-तां. प्रभु परमेश्वर ह्मणतो, दुष्टाच्या मरणाविषयीं मी कांहीं सं-तोषतों कीं काय ? त्यानें आपले मार्ग सोडून वांचावें, याविषयीं मी संतोषतों कीं नाहीं. कां कीं जो मरतो त्याच्या मरणावि-षयीं मी संतोषत नाहीं; ह्मणून तुह्मी आपणाला फिरवा आणि वांचा, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो. " कारण कीं, इस्राएलांस क्षमा करणारा आणि येशूरूनाचे वंशास माफ करणारा तूंच आहेस. आह्मास माफी करणारा व क्षमा करणारा तुजवांचून कोणी नाहीं. मोठयानें אדני שפתי वाचितांना पहिल्याने אתאנו לחלות पृष्ठ ६, אתאנו לבקש पृष्ठ ६ आणि אוחילה לאל पृष्ठ ७ हे भाग वाचावे; त्यापुढें ईश्वरी पवित्रतेच्या वर्णनांत व पापाविषयीं कबूल होण्यांत मात्र भेद आहे.

नेईलांतील ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך आणि हे राजा, याप्रमाणें आह्मी तुझी पवित्रता गाजीवतों. दो. वे.

וְהַשַׁמְלִים אֶרְאֶלִים आरआलिम आणि हाशमालिम दूत ज्यास थोर मानितात आणि स्तवितात, तो देवांचा देव कोठें आहे, असें ते एकप्रत्येकास विचारितात. वे'लोन * आकाशांतील दूत त्याचा मोठेपणा वाखाणितात; कांपून आणि थरथरून त्याची स्तुति गाजवितात; त्याजवळ सेराफीम उभे आहेत. राकीया* आकाशांतील सैन्यें एकदांच त्याची पवित्रता जागवितात; आणि भयानें व धासतीनें त्याची स्तुति गातात; त्यांतील प्रत्येकास सहा सहा पंख आहेत. शेहाकीम * आकाशांतील समुदाय त्याचें स्तवन प्रगट करितात; आणि त्याचें गौरव करायास ते त्याचे वस्तिस्थानांत उभे आहेत; दोन पंखानें ते आपलीं तोंडें झांकितात. झेबूल * आकाशांतील चमकते दूत त्याचें स्तवन करून त्याची पूर्णता गावयास त्वरा करितात; दो (पंखानीं) ते आपले पाय झांकितात. माओन * आकाशांतील राजकुमार दूत त्याच्या आश्रयाखालीं निवारा घेतात, आणि एकच जो देव तो त्यावर पाखर घालितो; ते दोन (पंखानें) उडतात. माखोन * आकाशांतील टोळ्या पाहारे बदलून वक्तृत्वानें स्तवन करायास एकवट होऊन एक प्रत्येकास हाक मारून ह्मणतात. आराबोथ * आकाशांतील दूतांचीं भयंकर सैन्यें सुंदर स्तुतीनें कीर्तन करायास उभे राहून पवित्र, पवित्र, पवित्र सैन्यांचा परमेश्वर असें ह्मणतात. ते त्यापुढें त्याचे सेवक इस्राएल याकरितां विनवणी करितात; कीं त्यानें आपले दासांस प्रसन्न होऊन त्याची सेवा मान्य करावी; कारण त्याच्या गौरवानें सर्व पृथ्वी भरली.

וּבְכֵן וּלְךָ תַעֲלֶה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אֱמֶת בְּסִפְרְךָ त्यां आपल्या पुस्तकाप्रमाणें † आपलें जग उत्पन्न केलें; त्यांत (आपल्या लोकांविषयीं) लिहून आपल्या मोहोरेनें मोहोर कर. तुझे शेष, जे तुझ्या सभामंडपाकडे लक्ष लावितात, आणि आज आपल्या पांच प्रार्थनांकडून तुला थोर मानितात,

* हीं सप्ताकाशांचीं नांवें आहेत. † गीत. १३९. १६.

त्यांस प्रसन्न हो. ते तुझ्या तारणाची आणि सांत्वनाच्या नेमिलेल्या वेळाची वाट पाहतात; हे परमेश्वरा ! ते तुझ्या कृपेची आशा धरितात, कारण तुजपाशीं क्षमा आहे. हे पवित्र (देवा !) तुझ्या नामाच्या दासांप्रमाणें जेव्हां ते तुझी पवित्रता गाजवितात, तेव्हां तूं त्यांचें ओरडणें अति उंच आकाशांत चढूं दे.

כתר יתנו पृष्ठ ९.

रिब्बी इसहाक बेन इस्राएल याने रचिलेली पापाविषयीं कबूल होण्याची रीति.

רבון העולמים हे जगतांच्या स्वामी, आह्माविषयीं जीवनांत मोहोर कर; आणि हे अदृश्य देवा, आह्मास जीवन व शांति दे. हे जीवंत देवा आणि पृथ्वीच्या राजा, तूं आपल्या कराराच्या लेंकरांविषयीं जीवनांत मोहोर कर. शुद्ध व अनुग्रहीत लोकांबरोबर जीवनाच्या पुस्तकांत आमची आठवण करून मोहोर कर; आणि आह्मा सर्वांकरितां जीवन लिही. हे महान व गौरवयुक्त देवा, तुझ्यां जवळ जीवनाचा उगम आहे; तुझ्या प्रकाशाने आमच्या दृष्टीस प्रकाश असतो, ह्मणून आज तूं आह्माविषयीं चांगल्या जीवनांत मोहोर कर. मग आकाशांत वस्ति करणाऱ्याच्या मंदिराचीं द्वारें बंद होण्याच्या समयीं, इस्राएलाचे अन्याय शोधण्यांत येतील, परंतु कांहीं नसेल; आणि येहुदाचीं पातकेंही, परंतु तीं कांहींच सांपडणार नाहींत. आणि आकाशाचीं द्वारें बंद होण्याच्या समयीं तूं त्यांच्या अपराधांची क्षमा कर; आणि त्यांचीं सर्व पापें तूं समुद्राच्या खोलवटींत टाक. तुझें (न्यायाचें दरबार) बंद होतांना जेव्हां आह्मी कबूल होतों, तेव्हां तूं आह्मास जीवनाचा मार्ग (कळीव;) तुझ्या समोर संतोषाचें पूर्णपण होऊं दे. आणि आह्मी तुजपुढें कबूल होतों, ह्मणून यावेळीं तूं आपलें मन फिरीव; मग जे कोणी कबूल होऊन आपलीं दुष्कर्मे सोडितात ते दया पावतील.

एथें מה נאמר לפניך हा जो भाग वाचायाचा तो पृष्ठ. ६२ एथें लिहिल्याप्रमाणें वाचावा. आणि दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेच्या आरंभीं, אל נורא हा जो भाग लिहिला आहे, तो कोणी आरंभीं वाचितात आणि कोणी पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना करण्याच्या पूर्वी वाचितात. त्यामागून हीं पुढील वाक्येंहि बोलतात.

המבדיל בין קודש पवित्राच्या व अपवित्राच्या मध्यें भेद राखणारा आमचे अपराध क्षमा करील. आमची संतति रेतीसारखी वाढवील.

זרעינו आमची संतति रेतीसारिखी वाढविल.

יצו יי חסדו त्याचा सेवक याकोब याच्या संततीवर दया होण्याविषयींची तो आज्ञा करील. आणि यहुदा ज्यास त्याने आपला विभाग असें मानिलें आहे, त्यास तो आपलें वतन धन असें करील.

צדק ושלום נשקו नीति व शांति यांनीं चुंबन घेतलें आहे, या पीडलेले लोकांच्या पीडकांस तो दुर्बळ करील.

חסד ואמת נפגשו दया व सत्यता एकत्र मिळाली आहे; त्या आम्हाजवळ येऊन पोहोंचल्या आहेत. तो त्यांस आमच्या शिरांवर राखील.

קדוש ישראל מושיעכם इस्राएलाचा पवित्र तुमचा तारक आहे; तो तुमचीं उलंघनें क्षमा करीलच करील; तुम्ही भिऊं नका आणि घाबरूं नका.

שובו לכם לאהליכם तुम्ही आपल्या घरीं * परत जा; आणि तुमच्या देवाच्या नामास धन्य ह्मणा, आणि नृत्य करून त्याच्या नांवाची स्तुति करा.

אלהי הצבאות יי पृष्ठ ४६.

שבט יהודה यहुद्याचा वंश जुलुमाखालीं व दुःखांत

* इ. राहोट्यांकडे.

आहे; (आतां) रानांत सिंह गर्जतो काय ? त्यांतील बाप लेंक, गरीब व दरिद्री तुझ्या तारणाची आशा करितात. आमच्या खंडणाच्या समयीं, आणि आह्मी हासण्याचें पात्र होऊं नये ह्मणून आह्माकरितां तूं उभा राहा. हे परमेश्वरा, तूं दूर कां उभा राहतोस? हे करूबांवर बसणाऱ्या, तुझे प्रिय लोक* मरणाच्या दरवाजाजवळ पोहोंचले आहेत, त्यांवर प्रकाशित हो. संकटसमयीं आह्मास साहाय्य कर; देवाचा हात अखूड आहे काय ? या लांबविलेल्या † प्रवासांत आमचे दिवस नवे कर; (हे देवा,) ऊठ, उगा कां राहतोस ‡ जो देश त्यांचा नाहीं, तेथें तुझे पुत्र असतां, त्यांची आठवण कर; परक्यांस त्यांजवळ येऊं देऊं नको. मोहोर करून गुप्त राखलेला शेवट एकुलत्यांस कळीव; मग सियोन ऐकून संतोष पावेल, आणि येहुदाच्या कन्या हर्ष करितील. हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आमच्या विनंतीला वरील आकाशांत तूं चढूं दे.

אל מלך भा. प. पृष्ठ ३७.

ויאמר אני भा. प. पृष्ठ ३८.

רחמנא אדכר לן भा. प. पृष्ठ ३८.

עננו מלך מלכי המלכים भा. प. पृष्ठ ४४.

חננו ״ भा. प. पृष्ठ ४६.

אלהינו שבשמים भा. प. पृष्ठ ४९.

זכרון לפניך בשחק (आमची) आठवण तुजपुढें सर्वकाळ राहावी, ह्मणून ती पुस्तकांत कोरून ठेव, आणि आब्राहाम व इसहाक यांजबरोबर केलेला सर्वकाळचा करार तूं मोडूं नको. तुला हाक मारणारे तुजपुढें नमन करायास येतात, तर बांधला गेलेल्या (इसहाकास) स्मर; § आणि तुझ्या शेरडांची दयेने पाहाणी करून त्यांस अन्य लोकांपासून वेगळें कर. ¶ हे

* इ. खवुत्र. † जुन्या झालेल्या. ‡ इ. झोपीं कां जातोस.

§ इ. उठीव. ¶ इ. त्याचें तोंड पट्टेदारांकडे लाव.

दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, तुझ्या गौरवास उठवून, जे झोपीं गेले आहेत त्यांस जागृत कर; आणि जे दूर केलेले लोक तुझ्यामुळें कांपत उंच आकाशांतून तुझी दया ओढून घेण्यास आले आहेत, त्यांस तूं आपणासाठीं खंडून घे.

אל מלך

מי אל כמוך हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस व आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उलंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे ? तो आपला क्रोध सर्वकाळ बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती, तो फिरेल, तो आह्मावर दया करील, व आमचे अन्याय धुळीस मिळवील, आणि त्यांचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. तूं याकोबासाठीं खरेपण व आब्राहामासाठीं करूणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांसीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती.

קדיש לעילא

एथपर्यंत वाचल्यावर हेखाल उघडतात.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

קראתי בכל לב

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

ण्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

ण्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

ण्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

יי הוא האלהים

परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.

एथें קדיש תתקבל भा. प. पृष्ठ. ९८ एथें लिहिल्याप्रमाणें वाचितात; परंतु त्यांतील תענו ותעתרו हें बोलल्यापूर्वी दाहा वेळ शोफार वाजवितात; तो येणेंप्रमाणें.— תשרת תשת תרת आणि קדיש पूर्ण झाल्यावर תרועה גדולה वाजवून हेखाल बंद करितात आणि हीं पुढील वाक्यें तीन वेळ बोलतात.

כל כלי יוצר कोणतेंही हत्यार जें तुजविरुद्ध घडलेलें आहे, तें साधारण नाहीं; आणि जी कोणती जीभ तुजसीं वाद करायास उठेल, तिला तूं अन्यायी ठरविशील, हाच परमेश्वराच्या सेवकांचा विभाग, आणि हेंच मजपासून त्याचें न्यायीपण आहे, असें परमेश्वर ह्मणतो. जे परमेश्वरासीं विरुद्ध होतील, ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यांजवर गर्जना करील; परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांची न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील. (तीं. वे.)

पुढें हीं वाक्योंहि बोलतात.

יבאו ויגידו तीं जाऊन जे जन्मतील त्या लोकांस त्यांचा न्याय सांगतील कीं, "त्याने केला आहे." तूं जा, हर्षाने आपली भाकर खा, आणि आनंदित हृदयाने आपला द्राक्षरस पी, कां कीं, आतां देव तुझीं कर्में मान्य करितो.

ही प्रार्थना संपल्यावर קדיש न करतां लागलेंच निद्याच्या संध्याकाळच्या प्रार्थनेस आरंभ करून אדני שפתי मध्यें אתה חוננתנו मात्र अधिक बोलावें, परंतु प्रायश्चित्ताचा दिवस शाब्बाथ दिवशीं असल्यास ארך ימים हेंहि अधिक बोलावें. आणि द्राक्ष रसावर धन्यवाद करितांना सुगंधावर धन्यवाद करूं नये. त्यानंतर चंद्राच्या मासिक गतीवरून धन्यवाद करावा; आणि आपले कुटुंबांतील सर्व मनुष्यांस व सख्यासोयऱ्यांस आशीर्वाद देऊन पुढें पांचव्या दिवशीं येणाऱ्या मांडव्याच्या सणाकरितां मांडव घालण्यास आरंभ करावा.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग दुसरा.

टीका.

टीका १.

मुख्य उपाध्याच्या पोषाकाचें वर्णन.

ציץ फूल; हें शुद्ध सोन्याचें केलेलें असे; आणि त्याजवर קדש ליהוה ह्मणजे "परमेश्वरासाठीं पवित्र" असे शब्द कोरलेले असत. तें फूल मुख्य उपाध्या आपल्या फेंट्याच्या समोरच्या बाजूस निळ्या दोरीनें बांधीत असे.

מעיל झगा; तो पूर्ण निळ्या रंगाचा असे; आणि गळ्यांत घालायासाठीं त्याच्या मध्यें तोंड असे. तो फाडला न जावा ह्मणून त्याच्या तोंडाभोंवतें व हाताभोंवतें गुंफित कामाची गोट असे. तो एकाच तुकड्याचा असे; आणि त्याजवर शिवण अगदींच नसे. त्याच्या खालच्या घेरावर निळ्या, जांबळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचीं डाळिंबें व सोन्याचे घुंगरू असत; एक डाळिंब व एक घुंगरू, एक डाळिंब व एक घुंगरू असीं तीं जोडलेलीं असत. ते घुंगरू अशासाठीं असत कीं, जेव्हां तो सुगंध दाखविण्यास आंत जात असे, तेव्हां तो सुगंध दाखवितांना घुंगरांचा अवाज होऊन सर्व लोकांच्या कानीं पडून, तेव्हांच त्या सर्वांनीं ईश्वरापुढें नमन करून धन्य ह्मणावें.

כתנת आंगरखा; हा मुख्य उपाध्यासाठीं व दुसऱ्या उपाध्यासाठींहि केलेला असे, मुख्य उपाध्याचा आंगरखा बहुतकरून दाट व तोकडा असे व तो आंत पांघरीत असे, परंतु दुसऱ्या उपाध्यांचा आंगरखा ढिला व पायघोळ असून, ते तो वर पांघरून त्याजवर कंबरबंद बांधीत, त्यास हातहि असत; आणि तो बहुतकरून सणाचे कापडाचा केलेला असावा असें वाटतें.

מכנסי בד चोळणा; हा सणाच्या कापडाचा केलेला असे आणि कंबरेपासून गुडघ्यापर्यंत एवढा लांब असे. मुख्य उपाध्याचा चोळणा व दुसऱ्या उपाध्यांचा चोळणा सारखाच असे.

חשן ऊरपट, याचें पूर्ण नाम חשן משפט ह्मणजे, न्याय ठरण्याचा ऊरपट, हा एफोदासारिखा सोनें व नीळें, जांबळें व किरमिजी रंगी व कातलेलें बारीक सूत याचा बुटीदार केलेला असे. तो वीतभर रुंद असे, आणि त्याजवर लहान लहान बारा रत्नें चार पंक्तींत ह्मणजे प्रत्येक पंक्तीनें तीन असीं बसविलेलीं असत, आणि त्यांतील प्रत्येक रत्न इस्राएलाच्या प्रत्येक पुत्राच्या नामानें होतें, तीं रत्नें येणेंप्रमाणें असतः—

रेऊबेन. आरक्तक.	शिमओन. पीतमणि.	लेवी. माणीक.
येहुदा. पांच.	दान. नील.	नाफताली. हिरा.
गाद. पन्नग.	आशेर. विचित्रक.	इस्साखार. याकूत.
झेबुलुन. लसणा.	योसेफ. गोमेद.	बिनयामीन. मणिरत्न.

याप्रमाणें तो असून वरल्या बाजूस सांकळ्या व कड्या यांजकडून एफोदावर खांद्यासीं गुंतविलेला असे, आणि खालच्या बाजूसहि कड्या व निळ्या फिती असून कंबरबंदासीं जोडलेला असे.

या ऊरपटाच्या आंतल्या बाजूस जें अस्तर असे त्याला एक

पिशवी असे; या पिशवींत אורים ऊरिम व תומים थुमिम असत. या नांवांचा अर्थ प्रकाश व यथार्थता असा होतो, परंतु त्यांजकडून ईश्वरी इच्छा कळून येत असे. हे ऊरिम व थुमिम तीन रत्नें होतीं आणि त्यांतील एकावर כן म्हणजे तसेंच किंवा होय; दुसऱ्यावर לא म्हणजे नाहीं असे शब्द कोरलेले होते; आणि तिसऱ्यावर कांहींच नव्हतें. ज्या कोणास आपल्या कामाविषयीं ईश्वरी मत घ्यावयाचें असे, तो मुख्य याजकाजवळ जाऊन विचारीत असे. मग तो मुख्य याजक ऊरपटाच्या आंत हात घालून त्या तिहींतून एक रत्न काढी. जर होय असें निघालें,तर त्यानें समजावें कीं तें काम सफल होईल; जर नाहीं म्हणून निघालें, तर तें काम सफल होणार नाहीं असें समजावें; परंतु ज्यावर कांहींच नसे तें निघालें, तर त्या प्रश्नास कांहींच उत्तर नाहीं, तो प्रश्न पुनः दुसऱ्या वेळीं पाहावा असें समजावें. याप्रमाणें कित्येकांचें मत आहे. दुसऱ्यांचें असें मत आहे कीं, त्या पिशवींत एकच रत्न असे, त्या रत्नावर ईश्वराचें न उच्चारायाचें नाम कोरलेलें असे. प्रश्न पाहातां वेळीं तीं अक्षरें जर चमकलीं तर "होय" असें उत्तर; परंतु जर न चमकलीं तर "नाहीं" असें उत्तर समजावें.

हारामबाम याने पवित्र मंदिरांतील पात्रांचें, व त्या मंदिरीं पूजन करणाऱ्या याजकांच्या वस्त्रांचें जें वर्णन केलें आहे, त्याच्या ९ व्या अध्यायांत असें आहे कीं, ऊरपट आणि उरीम व थुमिम हे एकच; आणि याच कारणास्तव त्यांस न्याय ठरण्याचा ऊरपट असें नाम होतें. परंतु याकोबाच्या बारा पुत्रांच्या नामांत इब्री भाषेंतील सर्व मूळ अक्षरें नाहींत, म्हणजे ק. צ. ט. ח हीं अक्षरें उणीं आहेत. तीं अक्षरें उणीं असल्यावरून एकाद्या प्रश्नाचें उत्तर मिळण्यास कदाचित अडचण पडेल, ती न पडावी, या कारणावरून त्या ऊरपटावर आब्राहाम, ईसहाक व याकोब यांचीं नावें असून שבטי יה असे शब्दहि त्याजवर असत. शास्त्रांत ह्या ऊरपटावर इस्राएलाच्या पुत्रांचीं नांवें मात्र होतीं असें लिहिलें आहे;

परंतु हारामबामाने १२२ व्या गीतांतील שבטי יה "अनंताचे वंश" या शब्दांतील יה या शब्दाच्या अक्षरांची संख्या धरून आब्राहाम, इसहाक, याकोब व याकोबाचे बारा पुत्र, असे अनंताचे पंधरा वंश, होते असें सिद्ध केलें आहे. या मत्ते त्यावर नांवें कोरलेलीं असत तीं येणेंप्रमाणें.—

आरक्तक. אברהם יצחק יעקב ראובן	पीतमणि. שמעון	माणिक. לוי
पांच. יהודה	नील. דן	हिरा. נפתלי
पन्नग. גד	विचित्रक. אשר	याकूत. יששכר
लसणा. זבולן	गोमेद. יוסף	मणिरत्न. בנימן שבטי יה

אפוד एफोद; हा सोनें, व निळें, जांबळें व किरमिज रंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा सुंदर बुटीदार केलेला असे. त्याचे दोन निराळे तुकडे, एक समोर व एक मागें असे असून, तो खांद्यावर बंदासारिख्या खांदपट्ट्यानें जडलेला असे. आणि दोन खांद्यांवरील त्या दोन खांदपट्ट्यांवर दोन गोमेद रत्नें सोन्याच्या साखळ्यांनी बसविलेलीं असत. आणि त्या दोन रत्नांवर इस्राएलाच्या बारा

पुत्रांचीं नावें म्हणजे प्रत्येकावर साहा साहा असीं त्यांच्या जन्माच्या अनुक्रमाने कोरलेलीं असत. त्या नांवाविषयीं रशी व हारामबाम यांमध्यें मतभेद आहे तो येणें प्रमाणें.—

हारामबामाचें मत्त.		रशीचें मत्त.	
डाव्याकडे.	उजव्याकडे.	डाव्याकडे.	उजव्याकडे.
שמעון	ראובן	גד	ראובן
יהודה	לוי	אשר	שמעון
זבולן	יששכר	יששכר	לוי
דן	נפתלי	זבולן	יהודה
אשר	גד	יהוסף	דן
בנימן	יהוסף	בנימן	נפתלי

आणि या प्रत्येक दगडावर पंचवीस अक्षरें व्हावी म्हणून योसेफाचे नांवांत ה हें अक्षर अधिक असे.

या एफोदास हात नसून, तो गळ्यापासून गुडघ्यापर्यंत लांब असे. मुख्य उपाध्या हा झग्याच्या वर पांघरून त्याजवर ऊरपट जोडीत असे; आणि त्याजवरून तो ऊरपट कधींच काढला जात नसे. दुसरे याजकहि एफोद पांघरीत असत, परंतु तो एवढा सुंदर नसे, साधा असे; म्हणूनच शास्त्रांत त्याचें कोठेंच वर्णन केलें नाहीं असें वाटतें.

מצנפת फेंटा, हा बारीक सणाच्या कापडाचा असे, मुख्य उपाध्याच्या व दुसऱ्या उपाध्यांच्या फेंट्यांमध्यें कांहींच भेद नव्हता; परंतु मुख्य उपाध्याच्या फेंट्यावर मागें लिहिलेलें फूल मात्र अधिक असे.

אבנט कमरबंद; हा सणाच्या कापडाचा असून तो एफोदासारिखा सोनें आणि निळें, जांबळें व किरमिज रंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा बुटीदार केलेला असे; तो एफोदावर कंमरेस बांधल्यावर त्याचे दोन शेवट खालीं लोंबत असत.

टीका २.
טבילה

याद हाहाझाका या ग्रंथांत טבילה "स्नान करणें" या विषयावर जो भाग आहे, त्याच्या दुसऱ्या अध्यायांत טבילה ह्मणजे शुद्धतेसाठीं स्नान करण्याविषयीं असा एक नेम सांगितला आहे कीं, स्नान करितांना अंगावर केशाएवढा लहान पदार्थ जर असला तर शुद्धता होत नाहीं. याच कारणास्तव मुख्य याजक काळजीनें व जपून स्नान करून मोठ्या चौकशीनें पाहात असे.

टीका ३.
परवाचें घर.

परवा याचे घराविषयीं גמרא मधील תמיד या भागांत असें आहे कीं, परवा हा कोणी अन्य जातीचा चेटकी होता. मुख्य उपाध्या अति पवित्र ठिकाणीं जाऊन जी सेवा करीत असे, ती पाहाण्याकरितां त्यानें पुष्कळ प्रयत्न केला; परंतु ती पाहावयास सांपडत नाहीं, ह्मणून त्यानें पवित्र मंदिराच्या बाहेरल्या बाजूस एक लहानसें घर बांधून त्याखालून तळवाट खणीत अति पवित्र ठिकाणाजवळ नेली. तेथें छिद्रें करून त्यांतून तो पाहत असे. हें त्याचें कृत्रिम समजल्यावर त्यास मारून टाकिलें. आणि जें घर त्यानें बांधिलें होतें, तें मग अर्पणाच्या पशूंचीं कातडीं खारविण्याच्या कामास लाविलें; आणि त्याच्या गच्चीवर मुख्य उपाध्यास अंघूळ करण्याचें ठिकाण केलें होतें.

टीका ४.
नीकानोराचा दरवाजा.

नीकानोराच्या दरवाज्याविषयीं גמרא मधील יומא या भागांत असें लिहिलें आहे कीं, दुसरें पवित्र मंदिर बांधतेवेळीं नीकानोर या नांवाच्या एका मनुष्यास, मिसरांतील आलेकझांड्रिया शहरास, त्या पवित्र मंदिराकरितां एक दरवाजा आणावयास पाठविला होता. तो दरवाजा घेऊन येतेवेळीं समुद्रांत वादळ पडलें.

तेव्हां त्या नावाडी लोकांनीं त्या दरवाज्याची एक झडप समुद्रांत टाकिली; तरी समुद्र शांत होईना व गलबत स्थिर राहीना. तेव्हां ते त्या दरवाजाची दुसरी झडपही समुद्रांत टाकूं लागले. तेव्हां तो नीकानोर ती झडप उरासीं धरून ह्मणाला कीं, तिजबरोबर मलाहि समुद्रांत टाकाल तर मी ती समुद्रांत टाकूं देईन; नाहीं तर टाकूं देणार नाहीं. असें तो ह्मणत आहे, इतक्यांत समुद्र शांत झाला. मग तें गलबत आखा या बंदरीं सुखरूप येऊन पोंचलें. मागाहून ती झडपहि तेथें येऊन जवळच लागली. याविषयीं कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, ती पोहोत आली. परंतु कित्येक असें ह्मणतात कीं, ती पितळेची होती ह्मणून ती पाण्यावर वाहूं शकली नाहीं; परंतु एका मोठ्या माशानें तीस गिळून किनाऱ्यास येऊन ओकून टाकिली. असा चमत्कार झाला व आणायास गेलेला मनुष्य, त्यासाठीं आपला जीव देण्यासहि तयार झाला; ह्मणून त्या दरवाजास त्याचें नांव ठेवून नीकानोराचा दरवाजा असें ह्मटलें.

परंतु योसीफुन इतिहास कर्ता २४ व्या अध्यायांत असें लिहितो कीं, आरामाचा राजा डेमत्रीयस यानें नीकानोर या सरदारास इस्राएलांबरोबर लढायाकरितां पाठविला. तो कित्येक वेळा विजयी झाला; परंतु शेवटीं मतातया मुख्य उपाध्याचा पुत्र यहुदा, यानें त्याचा पराजय करून त्यास मारून टाकिलें; आणि त्याचें डोकें व हात आणून त्या दरवाजांत टांगिले. यावरून त्यास निकानोराचा दरवाजा असें ह्मणतात. हा दरवाजा पूर्वेकडेस होता.

टीका ८.

दुयम उपाध्या.

हा दुयम उपाध्या नेमण्याचें कारण असें कीं, या दिवशीं पूजन करणाऱ्या उपाध्यास फारच भय असे. त्याच्या हातून एकादी लहानी चूक झाली, किंवा त्याच्या अंगीं कांहीं लहान दोष असला, तर तो त्याच ठिकाणीं मरत असे. असें झाल्यास या दिवसाच्या पूजनास अटकाव होऊं नये ह्मणून, हा दुयम उपाध्या

नेमिला जात असे; त्याने लागलेंच आंत जाऊन पूजन चालवावें. हें विघ्न आहारोनाचे दोघे पुत्र नादाब आणि आबीहू यांशिवाय दुसऱ्या कोणावर आलेलें शास्त्रांत अढळत नाहीं. परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं असें विघ्न कित्येक वेळां झाल्यावरून प्रायश्चित्ताच्या दिवशीं मुख्य उपाध्या अतिपवित्र ठिकाणीं जातेवेळीं त्याच्या पायास सांखळ बांधित, कारण असें विघ्न झाल्यास कोणी आंत न जातां त्यास ओढून काढावा. जो निर्दोष तो सुखरूप बाहेर निघत असे; परंतु ज्याचे अंगीं दोष असे, त्यास दयासनावरील दोन केरूबांमधून अग्नि निघून मारून टाकीत असे.

टीका ६.

कोंकऱ्यांवरील सोडती.

मुख्य उपाध्या दोन कोंकऱ्यांवर सोडती काढीत असे त्या अशा, तो त्या दोन कोंकऱ्यांच्या मध्यें येऊन उभा राहिला, ह्मणजे त्याज-पुढें एक पेटी आणून ठेवीत; त्या पेटींत दोन सोन्याचे तुकडे असत; त्यांतील एकावर ליי ह्मणजे ईश्वरी नामाकरितां आणि दुसऱ्यावर לעזאזל ह्मणजे आझाझेलाकरितां असीं अक्षरें लिहिलेलीं असत. ती पेटी जोराने हालविल्यावर तो आपले दोन्ही हात त्या पेटींत घालून दोन हातीं ते दोन तुकडे बाहेर काढी. जी सोडत उजव्या हातीं निघे ती उजव्याकडील कोंकऱ्यावर आणि जी डाव्या हातीं निघे ती डाव्याकडील कोंकऱ्यावर टाकी. ईश्वरी नामाची सोडत उजव्या हातीं निघाल्यास तो चांगला शकून असें लोक मानीत. शिमओन ज्याचें अडनांव यथार्थ हा मुख्य उपाध्या असतां, ईश्वरी नामाची सोडत नेहेमी उजव्या हातीं निघत असे; परंतु त्याच्या मागून कधीं उजव्या व कधीं डाव्या हातीं निघत असे.

टीका ७.

עזאזל

עזאזל या शब्दाच्या अर्थाविषयीं अनेक मतें आहेत. हें एका भूताचें नाम आहे, असें कोणी समजतात; परंतु असा अर्थ

होऊं शकत नाहीं; कारण भुताची सेवा करण्याविषयीं शास्त्रांत मनाई असतां, ईश्वरी नामाकारितां अर्पिला जाणाऱ्या कोंकऱ्याबरोबर या नामाच्या भुतासहि एक कोंकरा अर्पण करीत असत, असें अनुमान होत नाहीं. यासाठीं कोणी त्या शब्दाचीं עז आणि אזל असें दोन पदें करून मोकळा सोडिलेला कोंकरा असा त्यांचा अर्थ करितात; परंतु रशीने केलेल्या शास्त्रावरील टीकेमध्यें या शब्दाचा अर्थ उंच उभा कडा असा सांपडतो. एबेन एझेर याच्या ग्रंथाच्या יומא या भागांतहि असाच अर्थ केलेला सांपडतो.

टीका ८.

किरमिजी दोरा.

जो किरमिजी दोरा सांगितला आहे, तो लोंकरेचा असे. त्याचा रंग आपोआप पालटून शुभ्र होत असे. आणि असें झाल्यास ईश्वराने सर्व लोकांच्या पापांची क्षमा केली असें समजून येत असे. याप्रमाणें एक दोरा पवित्र ठिकाणाच्या दारावरही बांधीत; त्यावरून बहुदा हें समजून येत असे. कोंकऱ्यांस बांधलेल्या दोरावरून समजत नसे; कारण एक कोंकरा कापला जात असे, आणि एक कोंकरा कड्यावरून लोटला जात असे. या चमत्कारावरून ईश्वरी वचन अक्षरश: पूर्ण होत असे. तें वचन येणेंप्रमाणें:— "परमेश्वर ह्मणतो, याहो, आपण विवाद करूं; तुमचीं पापें जरी लाखेसारिखीं असलीं, तरी तीं बर्फासारिखीं पांढरीं होतील; किर्मिजाप्रमाणें जरी तांबडीं असलीं, तरी स्वच्छ लोंकरेसारिखीं होतील." यशाया. अ.१ओ.१८.

टीका ९.

אבן שתיה

या दगडाच्या "शेथिया" या नांवावरून असें अनुमान होतें कीं, हा कांहीं पायाचा दगड असावा; आणि हाखामीम लोक याप्रमाणें अनुमान करून असें ह्मणतात कीं, ज्या डोंगरांवर येरुशलिम नगर बांधलें होतें, त्या डोंगरांच्या पायाचा हा दगड होता. कित्येक त्या नामाचा "शेयाया" असा उच्चार करून "अनंत देवाने मांडलेला" दगड असा अर्थ करितात. हा दगड पहि-

ल्या भविष्यवाद्यांच्या दिवसांपासून अति पवित्र ठिकाणीं भूमीच्या वर तीन बोटें निराधार राहिला होता, असें משנהच्या יומא या भागांत सांगितलें आहे.

पहिल्या मंदिराच्या वेळीं सुगंधाचें धुपाटणें कोशाच्या काठ्यांच्या मध्यें ठेवीत, परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं या शेथिया दगडावर तें ठेवीत. याचें कारण असें कीं, दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं तो कोश ज्यास कराराचा कोश असेंहि ह्मणत, आणि ज्यांत ईश्वराने दिल्हेल्या दाहा आज्ञांच्या दोन पाट्या ठेविलेल्या होत्या, तो कोश नव्हता. हा कोश कोठें गेला व काय झाला याविषयीं अनेक मतें आहेत. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, नबुखादनेसार राजाने परमेश्वराच्या मंदिराच्या व राजाच्या घरच्या भांडारांतल्या ज्या वस्तु नेल्या, त्यांजबरोबर हा कोशहि नेला असावा. दुसऱ्यांचें असें मत्त आहे कीं, जेव्हां शलमोनाने परमेश्वराचें मंदिर बांधिलें तेव्हांच त्यास असें भविष्य कळलें होतें कीं, या मंदिराचा पुढें नाश होणार; यावरून त्याने कोशास लपवून ठेविण्याकरितां एक गुप्त स्थान बांधिलें होतें. नंतर योशीया राजास परमेश्वराच्या मंदिराचा नाश लवकरच होणार असें समजल्यावरून, त्याने कराराचा कोश शलमोनाने बांधून ठेविलेल्या गुप्त स्थानीं नेऊन लपविला. परंतु माकाबीच्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, ईश्वराने इर्मेयास सूचना केली कीं, तूं ज्या डोंगरावर मोशे गेला त्या डोंगराजवळ येईस, आणि देवाचें वस्तिस्थान पाहास तेथपर्यंत साक्षापणाची राहुटी व कोश तुझ्या संगातें आणायास आज्ञा कर. याप्रमाणें जेव्हां तो तेथपर्यंत गेला, तेव्हां तेथें त्यास एक गुहा सांपडली. त्यांत त्याने साक्षातपणाची राहुटी, कोश व धूपवेदि नेऊन ठेविली; आणि त्या गुहेचा दरवाजा बंद केला. नंतर जे लोक त्याच्या मागें गेले होते, ते त्या ठिकाणावर कांहीं खूण ठेवायास गेले, परंतु त्यांस ती गुहा सांपडली नाहीं. जेव्हां इर्मेयाने असें पाहिलें, तेव्हां तो त्यांचा निषेध करून त्यांस ह्मणाला कीं, जोंपर्यंत ईश्वर या लोकांस एकवट करी, आणि त्यांवर कृपा

करी, तोंपर्यंत तें ठिकाण गुप्तच राहील; नंतर परमेश्वर या वस्तु दाखवील. माकाबीचें दुसरें पुस्तक अध्याय २ ओंवी ४–८. परंतु बहुतेकांचें ह्मणणें असें आहे कीं, हा कोश, आहारोनाचीं फुलें उमललेली व बदामें आलेली काठी, मानाचें पात्र, ऊरीम व थुमिम व दुसऱ्या कांहीं वस्तु अतिपवित्र ठिकाणीं गुप्त होऊन अदृश्य झाल्या.

टीका १०.
כמצליף

"जसा कोणी मारायास हात वर करितो" याचा इब्री शब्द כמצליף असा आहे. या शब्दाची उत्पत्ति कोणत्या मूळ शब्दापासून झाली आहे याचा पूर्ण शोध नाहीं. हा शब्द צלף ह्मणजे मारणें या मूळ शब्दापासून निघाला असावा असें कोणी अनुमान करितात. परंतु हा मूळ शब्द सांप्रत उपयोगांत नाहीं, ह्मणून तो זלף शिंपडणें किंवा वाहाणें या तारगुम शब्दापासून निघाला असावा असें कित्येक कल्पितात. व्याकरणाच्या नियमाप्रमाणें त्या शब्दाचा मूळ शब्द צלף असावा; तरी זלף हा मूळ शब्द धरण्यास असा आधार आहे कीं, ז.ק.צ.ש हीं अक्षरें कधीं कधीं एकमेकांबद्दल लागतात. त्याच प्रमाणें ב.ו.פ आणि ד.ט.ת हीं अक्षरेंही कधीं कधीं एकमेकांबद्दल लागतात त्याचीं उदाहरणें एथें देण्याचें कांहीं अगत्य नाहीं.

टीका ११.
मुख्य उपाध्याच्या वस्त्रांचे गुण.

हाखामीम लोकांच्या मतें मुख्य याजकाच्या आठ वस्त्रांत आठ प्रकारच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याचे गुण होते. ते असे,— सोन्याच्या फुलाकडून निर्लज्जेचें, झग्याकडून अभद्र भाषणाचें, अंगरख्याकडून रक्तपाताचें, चोळण्याकडून नागवेपण उघडें करण्याचें, ऊरपटाकडून विपरीत न्याय करण्याचें, एफोदाकडून मूर्तिपूजनाचें, फेंट्याकडून गर्वाचें आणि कंबरबंदाकडून कुकल्पनेचें प्रायश्चित्त होत असे.

टीका १२.

द्विगुणें भजन करणें.

मनुष्याच्या अंगीं सद्विचार आणि दुर्विचार असे दोन गुण आहेत; त्यांतील पहिला יצר טוב हा त्यास सत्कर्माकडे वळवितो; परंतु दुसरा יצר הרע हा त्यास दुष्कर्माकडे वळवितो. हे नेहमीं एकप्रत्येकाविरुद्ध असतात; परंतु प्रायश्चित्ताच्या दिवशीं संसारसंबंधी कामें करण्यास आणि मनांतील कोणत्याही वांच्छा पूर्ण करण्यास मनाई आहे, ह्मणून त्या दिवशीं दुर्विचाराचें कांहींच सामर्थ्य चालत नसतां, सद्विचाराने मात्र नव्हे, परंतु दुर्विचारासहि जिंकून ईश्वरभजनीं तत्पर असलें पाहिजे.

या कर्त्यांच्या पुस्तकांबद्दल मतांचा सारांश.

पुस्तकांची पोंच.— " प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना " "वर्षप्रतिपदेची प्रार्थना " "पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना" असीं प्रार्थनेसंबंधीं तीन पुस्तकें आणि " इब्री पहिलें पुस्तक " मिळून चार पुस्तकें त्यांचे कर्ते मि० योसेफ येहेजकेल राजपुरकर, दावीद सासोन ह्यांच्या शाळेंतील शिक्षक व इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस, ह्यांनीं आह्मास पाठविलीं त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करतों. पहिलीं तीनहीं पुस्तकें हीं मूळ इब्री भाषेंतील प्रार्थनापुस्तकाचीं मराठी भाषांतरें होत. ह्यांत इस्राएल लोकांच्या धर्मांतील प्रार्थनेच्या रीति आहेत; तेणेंकरून इब्री भाषा न समजणाऱ्या अशा या देशांत राहणाऱ्या (ज्यांची हल्लीं भाषा ह्मटली ह्मणजे मराठीच झाली आहे) इस्राएल लोकांस स्वधर्मसंबंधानें फार उपयोगाचीं आहेत; चौथ्या पुस्तकांत इब्री व मराठी मूळ अक्षरांचा परस्परसंबंध व अक्षरचिन्हें हीं दाखविलेलीं असून, त्यावरून कांहीं शब्द व वाक्यें मराठी भाषांतरासह घातलेलीं आहेत. हें पुस्तक नूतनच मराठीवरून इब्री शिकणारांस उपयोगी होईल. मिस्तर योसेफ ह्यांनीं हीं पुस्तकें केवळ निरापेक्षपणें व परोपकारबुद्धीनें आपल्या लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीच्या उपयोगाकरतांच मुद्दाम केलीं आहेत असें समजावें. ह्या गुणाबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों. प्रा० दि० प्रा० हें पुस्तक ओरिएन्टल छापखान्यांत व दुसरीं तीन पुस्तकें गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत सुंदर ठसेछापानीं छापलेलीं असून त्यांची भाषाही सुबोध आहे.—**मित्रोदय** ता० २२डिसेंबर १८६७

पुस्तकपरीक्षा.

"पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना," "प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना" आणि " वर्षप्रतिपदेची प्रार्थना" हे तीन ग्रंथ, भषांतर कर्ते मि०

योसेफ येहेजकेल राजपुरकर, दावीद ससून शाळेंतील शिक्षक यांणीं आह्मास पाठविले त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. हीं भाषांतरें मूळ इब्री भाषेंतून महाराष्ट्र भाषेंत करून गणपतकृष्णाजी आणि ओरिएन्टल छापखान्यांत सुंदर टैपांवर छापून प्रसिद्ध केलीं आहेत. यांची किंमत ॥• रुपायापासून १। रुपायापर्यंत आहे.

जो धर्म आपण आचरितों त्याचें आपणास मर्मभेदज्ञान असणें अवश्य आहे, कारण येणेंकरून त्याजवरची आपली श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन अंतीं दृढ होते. परंतु हें ज्ञान होण्यास ज्या भाषेंत तो धर्म कथन केला आहे, ती भाषा आपणास अवगत असली पाहिजे. नाहीं तर धर्मावर श्रद्धा बसण्यास ज्या भक्तिभावाची गरज आहे तो आपणाठायीं किमपिही उत्पन्न होणार नाहीं. सांप्रत आमच्या देशबांधवांपैकीं कित्येक अन्यधर्मी लोकांची असी स्थिति झाली आहे. त्यांचे धर्मसंबंधी सर्व ग्रंथ अन्य भाषेंत असल्यामुळें ज्या धर्माचें ते आचरण करितात त्यांची त्यांस फारसी माहिती होत नाहीं. फक्त उपदेशक सांगतो ह्मणून आपणास तो आचरिला पाहिजे इतकेंच त्यांना ठाऊक असतें. अशावरून धर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा बसत नाहीं. याच प्रकारें आमचे इस्राएलधर्मी बंधुजन, ज्यांस ह्या देशांत जन्मल्यामुळें महाराष्ट्र भाषेचेंच वळण लागून गेलें आहे त्यांची स्थिति तशीच आहे असें आह्मास वाटतें, कारण तत्धर्मसंबंधी सर्व ग्रंथ इब्री भाषेंत असल्यामुळें त्यांना त्यांचें संपूर्ण ज्ञान नाहीं, तेणेंकरूनच त्यांची स्वधर्मावर श्रद्धा बसण्यास फार व्यत्यय येतो, असें ह्मटलें तरी चालेल. आणि यशायाचा भविष्यवाद अध्याय ६६ ओवी २ एथें परमेश्वर तर असें ह्मणतो कीं, जो दीन व अनुतापी आत्म्याचा असून माझ्या वचनाचें भय धरितो त्याकडे मीं पाहीन असें इस्राएलधर्मी ग्रंथांतील वाक्य असून परमेश्वराच्या वचनाचेंच मुळीं ज्ञान नसेल तर परमेश्वर त्यास पाहील तरी कसें? यास्तव तें ज्ञान होण्याचें ज्या गृहस्थानें साधन करून दिलें आहे त्याणें तत्धर्मी लोकांवर किती महत् उपकार

केले आहेत यांचा त्यानींच विचार करावा. आमच्या मतें तर मि० योसेफ आपल्या मोकळीकेचा वेळ अस्या परोपकारी धर्मकृत्यांत घालवून आपल्या स्वजनहितार्थ एवढा महत् प्रयत्न करितात त्याकरितां ते फारच स्तुतीस योग्य आहेत. अशा परोपकारी गृहस्थांचे श्रम सफळ करणें त्यांच्या बंधुजनांवरच आहे ह्मणून सर्वत्रानीं त्यांच्या भाषांतराच्या प्रती विकत घेऊन त्यांस आपला सदाश्रय द्यावा ह्मणजे त्यांस उत्तेजन येऊन ते आणखी असे अनेक ग्रंथ करण्याच्या स्तुत्य कामाकडे सतत लागतील.

मि० योसेफ यांच्या भाषांतराची भाषा बरीच पोक्त आहे आणि त्यांत त्याणीं सवघड व सुबोध शब्दांची योजना करून तिजला जेवढी गोडी आणवेल तेवढी आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याणीं असाच क्रम ठेविला तर उत्तरोत्तर यांचीं भाषांतरें फारच सुंदर होतील असें वाटतें.

याच गृहस्थानें एक इब्री पहिलें पुस्तक तयार केलें आहे. हें ज्या कोणाची ती भाषा शिकण्याची इच्छा असेल त्यास फारच उपयोगीं आहे. याची किंमतही फारच स्वल्प ४ आणे आहे. मि० योसेफ याणीं याचप्रमाणें दुसरें, तिसरें इत्यादि अनुक्रमानें त्या भाषेचें पूर्ण ज्ञान होण्यास अवश्य असीं आणखी पुस्तकें रचावीं असी आह्मी त्यांस अत्यादरानें शिफारस करितों.

हिंदुरिफारमर ता० १ जानुएरी सन १८६८.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१८	९	וביו םהשבת	וביום השבת
,,	१८	पहिल्याप्रमाणें एक्र	एक
४४	४	पूण	पूर्ण
,,	८	काहेने	कोहेन
४२	४	न येतें	येतें
४९	१०	אין כאלהינו पूर्वीं	קדיש תתקבל
५९	९	अनिष्ठांपासून	अमिष्ठांपासून